
जगदिश खांदेवाले
अकस्मात

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# अकस्मात

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वत: जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# अकस्मात

लेखक

जगदिश खांदेवाले

# अकस्मात

# लेखक... जगदिश खांदेवाले

फ्लॅट नं ११३ शिवशंकर सोसायटी.
शिवतीर्थ नगर कोथरुड पुणे ४११०३८
मो. नं ९१५८६६१६३८
Email id – jlkhandewale@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com
esahity@gmail. com
Whatsapp: 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : २० ऑक्टोबर २०२३**



©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे



उद्यमी, न्याय, अनाहुत, पाया रचिता, भास-आभास आणि दहावा मैल या ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे प्रकाशित झालेल्या माझ्या सहा कादंबऱ्यांना वाचकांनी उदंड प्रतिसाद दिल्याने मी ही सातवी कादंबरी सादर करीत आहे.


जरूर वाचा आणि तुमचेही मत जरूर कळवा. अनुकूलच असले पाहिजे असे नाही.

आपल्याला ही कादंबरी आवडेल अशी आशा करतो.

ई साहित्य प्रतिष्ठाचे श्री सुनीळ सामंत व त्यांचे सहकारी यांचे विशेष आभार.

. जगदिश खांदेवाले







# अर्पणपत्रिका

माझे नातू
चि. आदिराज (वय १ वर्ष ४ महिने),
चि. विराज (वय वर्षे सहा)
आणि चि. ओजस (वय वर्षे तेरा)
यांच्या सहकार्याशिवाय
मी एक शब्दही लिहू शकलो नसतो....

# अकस्मात

या कादंबरीतील सर्व घटना, स्थळे व व्यक्ती काल्पनिक असून त्यांचा कोणाही व्यक्ती स्थळ वा घटनेशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग मानावा.

# प्रकरण १

समीर म्हणजे वाऱ्याची मंद झुळूक पण हा समीर म्हणजे सोसाट्याचा वारा होता. गोरापान वर्ण, सहा फुटावर उंची, मध्यम बांधा, सतत कुतूहलाने भिरभिरणारी नजर, एवढ्या वर्णनाने हे रसायन काय आहे हे अजिबात कळत नसे. त्यासाठी त्याच्या संपर्कात येणे अती आवश्यक होते आणि एकदा का त्याने तुम्हाला आपले म्हणले की तुमचे स्वतंत्र अस्तित्व तुम्ही स्वखुशीने त्याला बहाल केलेच समजा.

याचे मुख्य कारण म्हणजे त्याचा स्वभाव. क्षणार्धात समोरच्याला आपलेसे करून टाकण्याच्या त्याच्या स्वभावामुळे तो सर्वांनाच हवासा वाटे. अगदी कॉलेजच्या जनरल सेक्रेटरीपासून ते जिमखान्याच्या पदाधिकाऱ्यापर्यंत तो लोकप्रिय होता. विविध विरोधी गटातपण त्याचा सहज वावर असे. यावर ताण करणारं त्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे एकदा आपले मानले की तो त्याच्यासाठी प्राण पणाला लावणार म्हणजे लावणार. सर्वांना बरोबर घेऊन, समजून काम करण्याच्या वृत्तीमुळे तो सर्वत्र लोकप्रिय होता. मुळातच नेतृत्व गुण असल्याने तो विद्यार्थी चळवळीत सहज ओढल्या गेला. तसेही राजकीय पक्ष अश्या नेतृत्वगुण असलेल्या, शिवाय चांगली वक्तृत्वशैली असलेल्यांच्या शोधात असतातच. त्यातूनच त्यांना भावी नेत्यांची दुसरी फळी तयार करता येते.

त्याच्या गुणांविषयी सांगता येतील अशा गोष्टी अनेक आहेत. ठळकपणे आठवणारी म्हणजे एका फी वाढ विरोधी मोर्चाची आहे. त्या मोर्चात समीर होता आणि समीरसह वीस जणांना अटक झाली होती. त्यात पाच-सहा मुलीपण होत्या, दुपारी दोनला अटक झाली आणि चार वाजेपर्यंत नावे, पत्ता नोंदणीचे काम पूर्ण झाले. इन्स्पेक्टर जरा हुशार होता. त्याने सर्वांना पोलीस व्हॅनमधे बसवले आणि शहराबाहेर साडेपाचपर्यंत व्हॅन पळवली आणि एका अशा जागी, जेथे फार रहदारी नाही तेथे थांबवली. सर्वांना खाली उतरवले आणि यू टर्न मारून सरळ परतीचा रस्ता धरला.

‘तुम्हा सर्वांचे रेकॉर्ड खराब होऊ नये म्हणून कोणताही गुन्हा नोंदवला नाही’ असे जायच्या आधी मोठ्याने ओरडून बजावयाला तो विसरला नाही.

त्यानंतर सुरवातीला तरी विद्यार्थ्यांना गांभीर्य कळले नाही. कोणत्या दिशेने जावे हे ठरवण्यात अर्धा तास घालवल्यावर त्यांच्या लक्षात झाले की किमान तीस किलोमीटर चालणे जरुरी आहे आणि ते आपल्या ताकदीच्या बाहेरचे काम आहे. सकाळ पासून वापरल्याने मोबाईलच्या बॅटऱ्यापण डाऊन झाल्या होत्या. जे मोबाईल चालू होते त्यांना रेंज मिळेना. एक ना अनेक.

अशा परिस्थितीत अपरिहार्यपणे समीरच्या गळयात नेतृत्वाची माळ पडली. थोडा विचार करून त्याने निर्णय दिला की परतीच्या वाटेने चालायला सुरवात करू कारण नुसत्या चर्चेनी काही होणार नाही. जर एखादे वाहन दिसले तर थांबवू आणि लिफ्ट मिळवू. तोही प्रकार अर्धा तास केल्यावर लक्षात आले की चालायची सवय कोणाला नसल्याने फारसे अंतर कमी झाले नाही आणि

रहदारी पण फार कमी आहे. जी काही तुरळक वाहने येत ती मोठा घोळका बघून वेग वाढवून निघून जात. जसा जसा अंधार पडू लागला तसतसा मुलींचा धीर सुटू लागला. त्या रडवेल्या झाला हे बघून समीरने एक धाडसी निर्णय घेतला आणि सर्वांना थांबवले. का, कशाला या प्रश्नांची उत्तरे न देता तो काही वाहन येते का याची वाट बघू लागला. त्याच्या नशिबाने एक ट्रक दूरवर दिसू लागला.

'हे बघा, हा ट्रक काहीही करून मी थांबवणार आहे. तुम्ही फक्त मला साथ द्या'एवढेच बोलून तो सरळ रस्त्याच्या मधोमध जाऊन उभा राहिला. ट्रक भरधाव वेगात होता. मधे उभ्या असलेल्या समीरला बघून ड्रायव्हरने जोरजोरात हॉर्न वाजवला पण समीर जागचा हालला नाही. वेग वाढवूनही हा जागचा हालत नाही हे बघून त्याने करकचून ब्रेक मारला आणि समीर पासून ५/६ फुटावर ट्रक थांबला. ड्रायव्हर शिव्या हासडतच खाली उतरला. त्याच्या शिव्यांचा जोर थोड़ा कमी झाल्यावर समीरने हात जोडून माफी मागीतली आणि अडचण सांगितली. समीरचे एकंदर वागणे बघून आणि एक नजर घोळक्यावर टाकताच ड्रायव्हर महाशय विरघळले. सर्वांना ट्रकमधे चढायची खूण करून त्यांनी सर्वांना आठच्या आत शहरात आणून सोडले. सर्वात शेवटी अर्थातच समीर आणि त्याची खास मैत्रीण मीना उरले. समीरने परत ड्रायव्हरचे आभार मानताच तो मनापासून म्हणाला, “गड्या, आहे खरा तू बहाद्दर. ” आणि गेलापण. ट्रक दूर जाताच मीनाने अभिमानाने समीरकडे बघितले आणि हळूच विचारले, “समीर ट्रकसमोर उभे राहतांना तुला भीती नाही वाटली?”

समीरने शांतपणे तिच्याकडे बघितले आणि तिला जवळ घेत म्हणाला, "वेडे, सर्वात जास्त तर मीच घाबरलो होतो. ”

दुसऱ्या दिवशी हा किस्सा कॉलेजमधे पसरला. तसा समीर आधीच लोकप्रिय होताच पण यामुळे त्याची लोकप्रियता अजून वाढली. प्रिंसिपॉलनी पण याची दखल घेऊन त्याला एकदा खाजगीत बोलावले आणि असे वेडे धाडस परत न करण्यास बजावले. इथेही समीरने त्याची विशेषता दाखवत त्यांना त्या पोलीस इन्स्पेक्टरला पण परत असे न करण्यास बजावा असे नम्रतेने सुचवले. प्रकरण येथेच संपले असे समीरला वाटले पण तसे व्हायचे नव्हते. चार-पाच दिवसांनी कॉलेजचा शिपाई समीरला शोधत लॅबमधे आला.

" समीर भाऊ, तुम्हाला साहेबांनी बोलावले आहे. ”तो म्हणाला.

“कशाला?"

“ कोण जाणे. कोणीतरी पोलीसातला साहेब आला आहे. "

“ चल, बघुया. ”असे म्हणत समीर त्याच्याबरोबर प्रिंसिपॉल कडे आला. प्रिंसिपॉलने त्याला बघताच आत येण्याची खूण केली. त्यांच्यासमोर एक पोलीस इंस्पेक्टर बसला होता. समीरला बस म्हणत प्रिंसिपॉलने इन्स्पेक्टरला विचारले,

"हाच तो मोर्चातला नेता काय?"

समीरकडे नीट बघत इंस्पेक्टरने होकारार्थी मान हलवली. नंतर त्यांनी समीरला विचारले,

"तुम्हाला शहराबाहेर नेऊन सोडणारे हेच इंस्पेक्टर होते काय ?" समीरने पण होकारार्थी मान हलवली. मग जरा कडक आवाजात त्यांनी इंस्पेक्टरला विचारले,

" अशी कृती केल्यावर तुम्ही मला किंवा विद्यार्थ्यांच्या पालकांना कळवायला पाहिजे होते. ती तुमची जबाबदारी होती. "

"होय सर. माझी चूक झाली. ” इंस्पेक्टर ओशाळून म्हणाला.

“आणि समीर तू पण अतिशय बेजबाबदारपणे वागला. परवानगी न घेता मोर्चा काढणे बरोबर नाही. ”

“ सॉरी सर, परत असे होणार नाही. ” समीर कसाबसा म्हणाला.

“तरी पण तुझी इच्छा असल्यास तू यांच्याविरुद्ध तक्रार नोंदवू शकतो. ”

“यांचाही काही दोष आहे असे मला वाटत नाही म्हणून मला तक्रार नोंदवायची नाही. ”

इंस्पेक्टरने चमकून समीरकडे बघितले. एक निश्वास सोडून प्रिंसिपॉल म्हणाले, " ठीक आहे. तुम्ही जाऊ शकता. "

बाहेर आल्याबरोबर इंस्पेक्टरने मनापासून समीरचे आभार मानले. समीरनेपण त्यात काय विशेष म्हणत आभार स्वीकारले आणि हळूच विचारले,

“ तुम्ही स्वतःहून आलात ?”

“ छे, हो, सरांनी बोलावले मग यावेच लागले कारण मी पण त्यांचा विद्यार्थी. " इंस्पेक्टर हसत म्हणाला.

समीर मित्रांसाठी काहीपण करायला तयार असे. मित्राचा अपमान त्याला सहन होत नसे. अशीच एक घटना नंतर लगेच झाली. जिल्हा पातळीवर ज्या स्पर्धा होत असत त्यात समीरचे कॉलेजपण सहभागी होत असे. कॉलेजमधे तसा मध्यमवर्गीयांचा भरणा जास्त असल्याने खेळपण श्रीमंती नसत, पण कशी कोण जाणे लॉनटेनिसमधे कॉलेजतर्फे एक जोडी उतरली, कधी बाय मिळत तर कधी नशिबाची साथ मिळाल्याने चक्क सेमी-फायनलपर्यंत पोचली. इथवर ठीक होते पण आता आशा पल्लवीत झाल्यने जरा चांगली प्रॅक्टिस केल्यास , मार्गदर्शन मिळाले तर फायनल जिंकू असे वाटू लागले. कॉलेजमधे तर काही सोय नहती. कोर्ट पण कामचलाऊ होते. मग समीरला ही अडचण सांगण्यात आली. झाले, मित्रकार्य म्हणजे घरचे कार्य असल्याने समीर तडक शहरातील रोटरी अध्यक्षांना भेटला. समीरचे वडील, उद्योजक असल्याने त्यांचे नाव माहिती होतेच. सर्व ऐकल्यावर त्यांनी क्लबला फोन केला आणि तेथील व्यवस्थापकाला मदत करायला सांगितले. व्यवस्थापकाने फोन वर हो-हो केले पण जेव्हा समीर मित्रांसह त्याला भेटला तेव्हा फारच वाईट वागणूक दिली. वरकरणी तो हसून बोलत होता पण तिरस्कार जाणवत होता.

“ त्याचे असे आहे समीर, मी जरूर तुझ्या मित्रांना कोर्ट उपलब्ध करून दिले असते अगदी एका आठवड्याकरता का होइना पण त्यांना इथला खर्च परवडणार नाही. ” त्याने सुरवात केली.

“कसला खर्च ?”

“ अरे इथे ड्रेस कोड असतो, शूज अनिवार्य. कॅप आवश्यक. टेंपररी मेंबरशीपचा खर्च. तोच पाच हजार प्रत्येकी आहे आणि होय त्यालापण वेटींग लिस्ट आहे. सांग तुझ्या मित्रांना परवडणार आहे का ते ?”

समीरचे मित्र हे ऐकूनच ओशाळले आणि समीरला निघायची खूण करू लागले. कोर्ट बघितल्यावर त्यांना झालेला आनंद पूर्ण मावळला होता. इकडे समीरलापण खूप संताप आला होता. वरकरणी तसे न दाखवता त्याने सहज विचारल्यासारखे केले, " या सप्ताहात क्लब मॅचेस असल्याने तारखापण मिळत नसतील?”

या मुलांना आपण कसे सहज गुंडाळले या आनंदात व्यवस्थापक महाराज म्हणाले, “अरे, ते तर सांगायचे विसरलोच. तीन दिवसांनी स्टेट लेव्हलच्या रोटरी मॅचेस आहेत. तुमच्या धसमुसळया प्रॅक्टिसने कोर्ट खराब झाले तर माझी नोकरी गेलीच समजा. "

"खरे आहे, तुम्ही इतकी बहुमोल माहिती दिली याबद्दल तुमचे आभार. ”

असे म्हणून समीर मित्रांसह बाहेर पडला. बाहेर आल्याबरोबर त्याने हात जोडून मित्रांची माफी मागितली. त्यांना या गोष्टी काही नवीन नव्हत्या म्हणून त्यांनीपण जाऊ दे तुझा काय दोष असे म्हणून विषय संपवला. त्यांनी विषय संपवला पण समीर विषय विसरायला तयार नव्हता. काय करायचे हे त्याने मनाशी ठरविले होते. मित्रांचा अपमान त्याच्या जिव्हारी लागला होता.

दोनच दिवसांनी शहराच्या स्थानिक वर्तमानपत्रात बातमी आली.

‘रोटरी क्लबच्या जिल्हा पातळीवरील टेनिस मॅचेस रद्द. व्यवस्थापकाच्या गलथानपणामुळे टेनिस कोर्टवर चिखल झाला. व्यवस्थापक निलंबित.’तसा या घटनेचा समीरशी दुरान्वयाने कोणी संबध जोडू शकत नव्हते. एक गोष्ट मात्र खरी आहे की समीरच्या घरी काम करणाऱ्या लक्ष्मीबाई मात्र या घटनेनंतर दोन-तीन दिवस समीरच्या आईकडे तक्रार करत होत्या की समीरच्या खोलीत झाडलोट करताना लाल माती जास्त निघते.

................ *..............

# प्रकरण २

असेच दिवस हसत खेळत निघून जात असता कधी फायनल परीक्षा जवळ आली ते कळले पण नाही. तशी समीरला काळजी करण्याचे काही कारण नव्हते. एकतर तो अभ्यासात चांगला होता आणि दुसरे म्हणजे घरच्या व्यवसायातच पुढे काम करायचे त्याचे निश्चित होते. फक्त त्याने वडिलांना एक सांगितले होते की त्याला इंजिनियरिंगनंतर इंग्लंडला दोन वर्षे M. S. करायची इच्छा आहे. त्याला अविनाशची त्याच्या वडिलांची काहीच हरकत नव्हती. बदलत्या काळानुसार ते पण शिक्षणाचे महत्त्व जाणून होते.

परीक्षा आटोपल्यावर त्याने बरीच शोधाशोध करून एक विद्यापीठ निश्चित केले. त्यांची प्रवेश परीक्षा एप्रिल महिन्यात १५ तारखेला होती. परीक्षा सहज पास करू अशी त्याला खात्री होती. तशी तो तयारी करु लागला. जून मधे त्या विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र सुरु व्हायचे होते..

एप्रिल १४ ला रात्रीची जेवणे आटपून तो बाबांबरोबर गप्पा मारत असतांना अचानक अविनाशला दरदरून घाम फुटला. छाती गच्च आवळून ते कसेबसे समीरला म्हणाले, "समीर मला कसेसेच होत आहे. "

समीरने ताबडतोब आईला हाक मारली. त्या धावतच आल्या. दोघांनी त्यांना सोफ्यावर निजवले, पाणी पाजले आणि समीरने त्याच्या फॅमिली डॉक्टरांना फोन केला. दहा मिनिटातच ते आले आणि त्यांनी सर्व सूत्रे हाती

घेतली. समीरला ते म्हणाले की यांना ताबडतोब हॉस्पिटलला न्यायला हवे. त्यांनीच भराभर फोन केले आणि अर्ध्या तासाच्या आत अविनाश सिटी हॉस्पिटलला ॲडमिट झाला. त्याला ICU मधे नेल्यानंतर तातडीने उपचारांना सुरवात झाली. त्यानंतर समीरला थोडी उसंत मिळाली. त्या सरशी त्याने प्रथम आईला धीर देत शांत केले. मित्रमंडळींना बोलावून घ्यावे असे एकदा त्याला वाटले पण परीक्षा झाल्यावर त्याचा ग्रुप गोव्याला गेल्याचे त्याला आठवले आणि तो विचार त्याने रहित केला. नंतर त्याला दिनूमामाची आठवण झाली. तो जवळच म्हणजे साताऱ्याला रहात होता. आईला आधार देण्यास त्याची फारच मदत होईल असे त्याला वाटले शिवाय त्याचे आणि अविनाशचे फारच मेतकूट होते. मामाला बोलावणे हेच योग्य होईल असे म्हणून त्याने फोन लावला. एव्हाना रात्रीचे दोन वाजले होते. मामाने दुसऱ्याच रिंगला फोन उचलला.

“काय रे समीर, सर्व ठीक आहे ना? "त्याने घाबऱ्या आवाजात विचारले.

समीरने शांतपणे काय झाले ते सांगितले आणि लवकर ये म्हणून विनवले. कुठला मामा आपल्या भाच्याची अशी विनंती नाकारेल, त्यातून हे तर घट्ट विणीचे नाते.

'तू काही काही काळजी करू नकोस मी ताबडतोब निघत आहे’असे मामाचे आश्वासक बोलणे ऐकताच एक सुटकेचा निश्वास सोडून त्याने मोबाईल बंद केला व तो आईजवळ जाऊन बसला.

" काय म्हणतो दिनू, येत आहे ना?" त्याच्या आईने विचारले.

“ होय. अगदी आत्ता निघाला तरी चार वाजेपर्यंत येईल. "

“बरे होईल बाबा. " असे म्हणून त्या गप्प बसल्या. तेवढ्यात डॉक्टर आले आणि समीरने काही विचारायच्या आत त्याच्या हातात एक प्रिस्क्रिप्शन देत म्हणाले, "हे इंजेक्शन ताबडतोब आण. ” नंतर राधाबाईंना उद्देशून म्हणाले," वहिनी तुम्ही काही काळजी करू नका. सर्व ठीक होईल. ”आणि पटकन गेले.

समीर धावतच हॉस्पिटलच्या मेडिकल स्टोअरला गेला. या वेळेसपण तिथे गर्दी होती. समीरचे प्रिस्क्रिप्शन वाचल्यावर केमिस्ट म्हणाला, “सॉरी सर. पण आत्ता याचा स्टॉक नाही. ”

“दुसरीकडे कुठे मिळेल ?" समीरने विचारले

" एक मिनिट थांबा, मी फोन करून कन्फर्म करतो. " असे म्हणत त्याने पटापट दोन तीन फोन केले. नंतर समीरकडे वळून तो म्हणाला,”चेलानी हॉस्पिटलला स्टॉक आहे पण त्यांच्याकडे पाठवायला माणूस नाही आणि तुम्ही तर बघताच मी इथे एकटाच आहे. ”

"काही हरकत नाही. मी आणतो. " असे म्हणत समीर निघणार तेवढ्यात केमिस्ट म्हणाला," जाणार कसे? गाडी आहे?" समीरच्या उत्तराची अपेक्षा न करता त्याने त्याच्या स्कूटरची किल्ली समीरला दिली.

“संभाळून जा. घाई करू नका. " असे म्हणून तो आपल्या कामाला लागला.

स्कूटर समोरच होती. केमिस्टच्या समयसूचकतेचे समीरला कौतुक वाटले. त्याने स्कूटर सुरु केली व निघाला, चेलानी हॉस्पिटल जवळपास आठ किलोमिटर अंतरावर होते. रात्रीची वेळ असल्याने ट्रॅफिक कमी असणार आणि आपण फारतर अर्ध्या तासात परतू असे त्याला वाटले. पाच मिनिटातच त्याच्या लक्षात आले की आपल्या वेळेच्या अंदाजात आपण स्कूटरची कंडीशन धरायला पाहिजे होती कारण ती स्कूटर काही एकहाती वापरातली नव्हती. त्याचा परिणाम म्हणजे ती बरीच खिळखिळी झाली होती. फक्त पेट्रोल आणि हवा एवढ्या दोनच गोष्टींवर ती चालत असावी हे स्पष्ट होते. हॉर्नची काही गरज नव्हती कारण बाकी खडखड आवाज भरपूर होते. हेडलॅम्प नावापुरताच चालू होता. कधी तो फुल ब्राईट असे तर कधी मिणमिणता दिवा.

असू दे. अर्ध्या तासाचा तर प्रश्न आहे असा अश्या विचाराने समीरनी ती स्कूटर रेटली. एवढ्या खराब स्थितीतपण त्याने पंधरा मिनिटात चेलानी हॉस्पिटल गाठले आणि इंजेक्शन ताब्यात घेतले व परत सिटी हॉस्पिटलला निघाला.

'बस अजून पंधरा मिनिटेच'तो स्वतःशीच म्हणाला. सुरवातीचे पाच मिनिटे तर सुखरुप पार पडली. त्यानंतर जो तीन किलोमिटरचा पॅच होता तो जरा निर्जन होता. त्यावर काही उजेड नव्हता, जाऊ असेच असे त्याला वाटले तेव्हाच हेडलॅम्प बंद झाला. आता याला काय झाले हे बघण्यात, वेळ घालवण्यात काही अर्थ नव्हता. एवढे तीन किलोमिटर पार पडले तर लाईटची गरजपण पडणार नाही असा विचार करून त्याने वेग वाढवला. रस्ता तसा सरळ होता शिवाय

आधी एकदा आल्याने त्याला अंदाजपण आला होता. डोळे ताणून ताणून तो गाडी चालवत होता. रहदारी नव्हतीच. तेवढ्यात त्याला काही कळायच्या आत तो एका व्यक्तीवर धडकला आणि ती व्यक्ती अस्फुटपणे किंचाळून बाजूला पडली. कसाबसा तोल सावरत त्याने स्कूटर कडेला थांबवली. या गडबडीत एका खड्याच्या हादऱ्याने त्याच्या खिशातील मोबाईल उडाला आणि रस्त्यावर पडला.

'सत्यानाश'तो मनाशी पुटपुटला आणि त्याने इंजेक्शन चाचपले. ते सुरक्षित असल्याचे बघून त्याने एक सुटकेचा निश्वास टाकला व तो धावतच त्या व्यक्तीपाशी गेला. त्याने त्याला नीट निरखून बघण्याचा प्रयत्न केला पण अंधारामुळे काही नीट दिसत नव्हते. मोबाईलच्या टॉर्चमधे बघू असा विचार मनात येताच त्याने रस्त्यावर पडलेला मोबाईल शोधला आणि सुरू करण्याचा प्रयत्न केला. पण येथेही त्याची निराशा झाली, मोबाईल सुरु होईना. हाती वेळ तर फार कमी होता म्हणून त्याने तो नाद सोडला. तो परत धावतच त्या व्यक्तीकडे गेला. तो एव्हाना बेशुद्ध झाला होता. अंधारामुळे किती लागले हे बघायची पण सोय नव्हती. समीरने घाबरतच त्याला चाचपले. निदान हाताला तरी काही रक्त लागल्याचा तरी भास झाला नाही. त्याने त्याचा श्वास बघितला. चालू होता. त्याने निरखून बघण्याचा प्रयत्न केला. त्याच्यापेक्षा थोडा मोठा तरुण वाटत होता. अंधारामुळे चेहरा नीटसा दिसत नव्हता. समीरने आजूबाजूला बघितले. रस्ता पूर्ण निर्जन होता आणि यावेळी कोणी येण्याची शक्यता पण नव्हती. काय

करावे या विचारात तो पडला. याला मदत करत बसलो तर वडिलांचे काय हा विचार त्याच्या मनात प्रबळ झाला.

रस्त्याच्या कडेलाच एक गुलमोहराचे झाड़ होते. समीरने त्या तरुणाला किंचित बसते केले. त्याच्या बगलेत हात घालून त्याने त्याला ओढत त्या झाडाखाली नेले. गुलमोहराच्या बुंध्याला टेकून त्याला बसते केले. आपल्या जवळील पाण्याची बाटली त्याच्याजवळ ठेवली. ऐकू जाणार नाही याची खात्री असूनही तो त्याला म्हणाला, “ मित्रा माफ कर. तुला असाच सोडून जात आहे. पण थोडा दम धर,सवड मिळताच मी परत येईन. ” असे म्हणून त्याने परत स्कूटर सुरु केली आणि सिटी हॉस्पिटलकडे निघाला. नंतर मात्र कसलीही गडबड न होता तो दहा मिनिटात हॉस्पिटलला पोचला. समीर आईजवळ धावतच गेला पण ती काही बोलायच्या आत डॉक्टर बाहेर आले. समीरच्या हातून त्यांनी इंजेक्शन जवळपास हिसकावून घेतले आणि परत आत गेले. समीरने प्रश्नार्थक मुद्रेने आईकडे बघितले आणि विचारले, “ काय झाले?"

“ काही सांगत नाही. ” आई उत्तरली. तेवढ्यात दिनूमामा येतांना दिसला आणि समीरच्या मनावरचा ताण उतरला. तो धावतच जाऊन मामाच्या गळयात पडला. इतका वेळ असह्य झालेला ताण अश्रुरुपाने त्याच्या डोळयातुन बाहेर पडू लागला.

“अरे हो, हो. स्वतःला सांभाळ. आता मी आलो आहे ना?” असे म्हणत दिनूमामाने त्याला शांत केले.

नंतर अडखळत समीरने आतापर्यंत काय झाले ते मामाला सांगितले. अर्थात अपघाताची घटना सोडून.

“अरे डॉक्टर बापट आहेत ना? मग कसली काळजी करतो?” मामा म्हणाला तेवढ्यात डॉक्टरच बाहेर आले. ते आता बरेच रिलॅक्स वाटत होते. ते दिनूमामांना चांगले ओळखत होते. मामांना बघून ते खुश झाले आणि म्हणाले, “बरे झाले मामा तुम्ही आलात. आता समीरला जरा दिलासा मिळेल. ”

“ पण डॉक्टर काही काळजीचे कारण तर नाही ना?”

"तो एकदम ठीक आहे, आता कसलाही धोका नाही. आठ वाजता एक ऑपरेशन करावे लागणार आहे. ”

“ धोका नाही तर ऑपरेशन कशाला ?” दिनूमामा म्हणाले.

“भविष्यात धोका होऊ नये म्हणून. ” डॉक्टर म्हणाले, “अर्थात तुमची संमती असेल तर. ”

“आमची काहीच हरकत नाही, तुम्हाला काय योग्य वाटेल ते करा. " राधाबाई म्हणाल्या. आता त्या बऱ्याच सावरल्या होत्या.

“ ठीक आहे. माझी हीच अपेक्षा होती. ” असे म्हणून डॉक्टर गेले.

ऑपरेशन यशस्वीपणे पार पडले. त्यानंतर डॉक्टरांनी दिनूमामा सोडल्यास राधाबाई आणि समीरला सक्तीने घरी पाठवले.

जेवल्यावर तो शांतपणे सोफ्यावर बसून विचार करू लागला. ती अपघाताची घटना, जी इतका वेळ इतर घटनांमुळे इतका वेळ दबून बसली

इतका होती ती आता उसळी मारून बाहेर आली. काय झाले असेल त्याचे?तो मेला तर नसेल ? आता इथले जरा स्थिर झाले आहे तर त्याचे काय झाले हे बघणे, मदत करणे हे आपले कर्तव्य आहे. हा विचार मनात येताच त्याने आईला सांगितले मोबाईल बिघडला आहे. मी त्याच्या दुरुस्ती करता जात आहे. वेळ लागला तर मी परस्पर हॉस्पिटलला जाईन. तिच्या उत्तराची वाट न बघता तो घराबाहेर पडला. प्रथम तो मोबाईलच्या दुकानात गेला. मोबाईल दुकानदाराला देत त्याने दुरुस्त होत असेल तर बघा नाहीतर दुसरा मोबाईल द्या आणि किती वेळ लागेल हे विचारले. दुकानदाराने मोबाईल उलटसुलट करून निरखून बघितला.

“ मी प्रयत्न करतो पण खात्री देत नाही. ” विक्रेता म्हणाला. त्याकडे साफ दुर्लक्ष करीत समीर म्हणाला, “ मी किती वाजता येऊ?”

“ या दोन वाजता. ” दुकानदार उत्तरला. समीरने घड्याळ बघितले. बारा वाजले होते. रात्रीच्या घटनास्थळी सहज जाऊन येणे शक्य होते. ठीक आहे म्हणून तो निघाला.

अर्ध्या तासातच तो त्या रस्त्यापर्यंत पोचला. आता दिवसा तोच रस्ता वेगळाच भासत होता. ‘गुलमोहर स्ट्रीट’ही रात्री न दिसलेली पाटी आता स्पष्टपणे दिसत होती. रस्त्याच्या दुतर्फा गुलमोहराची झाडे असल्याने नावपण यथार्थ होते. याही वेळेस रहदारी तुरळकच होती. समीरने साधारणपणे दहा मिनिटे गाडी संथपणे चालविली. नंतर काल जेथे अपघात झाला होता ते ठिकाण आल्यासारखे त्याला वाटले. त्याने यू-टर्न मारून गाडी दुसऱ्या बाजूला घेतली

आणि थांबविली. खाली उतरून त्याने नक्की कोणत्या झाडापाशी आपण त्या व्यक्तीला बसवले यांचा अंदाज घेतला पण तेथे कसलीही खूण दिसली नाही. ज्या खड्डयात स्कूटर गेल्याने मोबाईल उडून खाली पडला तो खड्डा मात्र त्याने अदमासे ओळखला म्हणजे जवळच्याच झाडापाशी आपण त्याला बसते केले असणार. त्या झाडापर्यंत काही ओढत नेल्याच्या खुणा दिसतात काय हे त्याने बारकाईने बघितले पण जमीन खडकाळ असल्याने काहीच दिसले नाही. निदान पाण्याची बाटली तरी आसपास कुठे पडली असेल असे त्याला वाटले पण ती पण कुठे सापडली नाही.

कदाचित हे झाड नसेल असा विचार करून त्याने आजूबाजुची चार पाच झाडे व त्यांचा परिसर तपासला पण काहीही आढळले नाही. स्पॉट ओळखण्यात आपली काही गफलत होत नाही याची त्याला खात्री होती. मग एवढ्या रात्री त्याला कोणी नेले असेल? की तो स्वतःहून गेला असेल ? त्यावेळी त्याची स्थिती काय असेल? स्वतःहुन तर तो गेला नसेल याची त्याला खात्री होती. अशा विचारांनी तो सैरभैर झाला झाला. एक तर दुपारची वेळ, डोक्यावर तळपता सूर्य या सर्वामुळे त्याला गरगरू लागले. कसाबसा तो गाडीत बसला आणि त्याने ए. सी लावला . पाच मिनिटांनी त्याला थोडे बरे वाटल्यावर त्याने गाडी सुरू केली आणि परत निघाला.

रस्ता संपल्यावर उजवीकडे वळतांना त्याला एक टपरीवजा हॉटेल दिसले. याला विचारून बघू कदाचित काही माहिती मिळेल असा विचार करून त्याने गाडी थांबवली आणि तेथील बाकावर बसला.

'एक कोला’त्याने ऑर्डर दिली. मालकानेच त्याला कोला आणून दिला. नोकर दिसतच नव्हता. समीरने कोला अर्धवट संपवला आणि काऊंटरवर पैसे देतेवेळी काल या रोडवर काही अपघात झाला होता का? असे विचारले.

“ नाही . ”

“सकाळी, पोलीस, अँब्युलस वगैरे काही दिसली का? “

मालक जरा विचारात पडला आणि म्हणाला, “ सकाळी आठच्या आधी काही झाले असेल तर माहिती नाही कारण मी आठला हॉटेल उघडतो. ” म्हणजे इथूनही काही माहिती मिळणार नाही हे लक्षात आल्याने समीर गाडीत बसला आणि त्याने गाडी सरळ मोबाईलवाल्याकडे नेली. दुकानदाराने त्याला बघताच एक नवीन मोबाईल आणि प्लास्टिकमधे गुंडाळलेला जुना मोबाईल त्याच्यासमोर ठेवला.

“जुना रिपेअर होऊ शकत नाही. डेटा ट्रान्सफर केला आहे. ” तो म्हणाला. ठीक आहे म्हणत समीरने बिल दिले आणि गाडी हॉस्पिटलकडे वळवली.

तेथे मात्र त्याला दिलासा देणारे दृश्य दिसले. दिनूमामा अविनाश जवळ बसलेला होता. आणि बाहेर मीना आणि त्याचा परममित्र अजय बसले होते. त्याला बघताच दोघेही उठले आणि एकदमच बोलू लागले.

“अरे एवढे काही झाले आणि आम्हाला कळवले पण नाही? तू आम्हाला साधा मिस कॉल तरी देऊ शकत होता. ”

“अरे हो हो. तुम्ही एकतर गोव्याला गेला होता. कळवून तरी काय होणार होते?नाहीतरी आज येणारच होता आणि आलात पण. ”

“ आमची ट्रिप काही एवढी महत्वाची नव्हती. ” अजय म्हणाला.

“मान्य आहे. पण माझ्या मोबाईलची ही दशा झाली होती. ”दोन्ही मोबाईल समोर धरत समीर म्हणाला. यावर दोघांनीही काही बोलणे वाढविले नाही. आता पुढे तू काही धावपळ करायची नाही हे मात्र त्यांनी खडसून सांगितले. नाही म्हणले तरी त्यांच्या येण्याने समीरला हायसे वाटले होते.

“मीना,तुला आताचे काम म्हणजे मामाला घरी घेऊन जा. त्याचे जेवणपण झाले नाही आणि आईजवळ थांब. ती पूर्ण विश्रांती घेईल हे बघ. ”

ठीक आहे म्हणत मीना मामांबरोबर निघाली. मामा संध्याकाळी सात वाजता डॉक्टरांचा राऊंड आहे तेव्हा तू आईबरोबर ये मग डॉक्टर काय म्हणतात त्यावरून ठरवू असे म्हणत तो त्यांना सोडायला गेला.

................ *..............

# प्रकरण ३

परत आल्यावर रिसेप्शनवर नर्स एका पेशंटच्या बरोबर असलेल्या लोकांशी काही बोलत असताना त्याने बघितले. एक अपघाताची केस होती. बरोबरचे मित्र , परिवार ताबडतोब उपचार सुरु करा म्हणून आग्रही होते. नर्स चांगला प्रतिसाद देत होती. तिने पेशंटला लगोलग डॉक्टरांच्या ताब्यात दिले आणि एकाला फॉर्म भरायला दिला. माहिती भरता भरता तो माणूस विचारू लागला. “हा पोलीसांचा कॉलम कशासाठी? तिथे काय भरायचे? आम्हाला पोलीसांना रिपोर्ट करायचा नाही. ”

“ नाही कसे भाऊ?” नर्स समजूतीच्या स्वरात म्हणाली, “ ही अपघाताची केस आहे. पोलीसांना रिपोर्ट करणे आवश्यक आहे. ”

“ते काय करणार?”

नर्सला असल्या प्रश्नांची सवय होती . ती शांतपणे म्हणाली, “ ते काही करोत अथवा न करो. प्रोसिजर आहे. या आधी पोलीस रिपोर्ट नसला तर उपचारपण सुरु करता येत नव्हते. आता रिपोर्ट नंतर केला तरी चालतो तर तुम्ही आडव्यात जाता. ”

तो माणूस जरा वरमून म्हणाला, “तसे नव्हे पण आता हे सर्व सोडून पोलीस स्टेशनला कोण जाणार?”

“ तुम्ही जायची गरज नाही. मी त्यांना कळवेन आणि त्यांच्यापैकी कोणीतरी येईल. ” नर्स म्हणाली. यावर कुरकुरत का होईना पण तो माणूस फॉर्म भरु लागला, इतका वेळ ऐकणाऱ्या समीरकडे आता नर्सचे लक्ष गेले.

“ तुमचे काय?” तिने विचारले.

"काही नाही. माझे वडील ICUत आहे. ” समीर म्हणाला आणि सहज विचारावे तसे त्याने विचारले, “ सिस्टर, प्रत्येक अपघाताची केस पोलीसांना रिपोर्ट करावी लागते?”

“ होय. अपघात, आत्महत्या,आकस्मिक मृत्यू , जळणे, भाजणे, मारामारी वगैरे. ” नर्सने त्याच्या ज्ञानात भर घातली आणि आपल्या कामाला लागली. म्हणजे काल रात्रीची केसपण कोणत्यातरी पोलीस स्टेशनला रिपोर्ट झालीच असेल असा विचार करत समीर ICU कडे परतता अजय बाहेरच बसला होता. समीर त्याच्या जवळ जाऊन बसला. अजयने त्याच्या पाठीवर हात ठेवला आणि हळू आवाजात विचारले, “ खरे सांग काय झाले?”

समीरला आठवेना आपण याला कधी काय बोललो म्हणून तो संभ्रमात पडला. त्याबरोबर अजय पटकन म्हणाला,“तू काही आठवायचा प्रयत्न करू नकोस. तुझे काहीतरी बिनसले आहे खरे आहे ना? एन्ट्रन्स एक्झाम देता आली नाही म्हणून वाईट वाटते का?”

“छे छे काहीतरीच काय” समीरने उडवून लावले.

“ मग काय झाले?”

झाले. आता याला सांगणे भाग आहे पण ठीक आहे हा मदत तर नक्कीच करेल असा विचार करून समीर म्हणाला मीनाला येऊ दे दोघांनाही एकदमच सांगेन. तेवढ्यात जणू आमंत्रण दिल्यासारखी मीना आली.

कोणालाही सांगणार नाही या अटीवर समीरने सर्व घटना तपशीलवार सांगितली. सर्व सांगितल्यावर त्याला जरा हलके वाटले आणि तो त्यांच्या प्रतिक्रियेची वाट बघू लागला सर्वप्रथम बोलता तो अजय. समीरचे हात धरत तो म्हणाला, “ यार, तू तर फारच अप्पलपोटा निघाला. एवढे मोठे दुःख एकट्यानेच सहन करायचे ठरवले. ”

समीर यावर काही बोलणार तेवढ्यात तो पुढे म्हणाला, “ ते काही नाही. इथून पुढे तू फक्त घरी लक्ष दे. त्या व्यक्तीला शोधणे ही माझी जबाबदारी. ”

यावर उसळून मीना म्हणाली, “ काही गरज नाही हे सर्व करण्याची. जे काही करता येण्यासारखे होते ते समीरने आधीच केले आहे. काही दुर्घटना झाली असती तर एव्हाना बातमी आली असती. स्वतःहून त्याला शोधणे म्हणजे एक प्रकारे सद्गुण विकृतीच म्हणावी लागेल. ”

समीरला मीनाचे असे बोलणे अपेक्षित नव्हते. तो आश्चर्याने म्हणाला, “मीना तू हे बोलते ? तो पण कोणाचा तरी मुलगा, भाऊ असेल, त्याला मदतीची गरज असेल. ”

“ असेल किंवा नसेल पण त्याला शोधायला गेलास तर तू मात्र पोलीसांना आयता सापडशील त्याचे काय?”

“ जे होईल ते होईल आणि झाले तर माझे होईल पण माझ्या मनातील बोचणी तर नष्ट होईल. नाहीतर मी जन्मभर स्वतःला माफ करू शकणार नाही.”

“म्हणजे तू हा हट्ट सोडणार नाही ?”

“ नाही. ” समीर ठामपणे म्हणाला.

“ मग बस तू तुझी तत्वं आणि मूल्यं गोंजारत. मला या गोष्टी कुरवाळत बसण्याची इच्छा नाही. यातून तुझे करिअर उध्वस्त व्हायची शक्यता जास्त आहे. ”

“ होऊ देत. ”

“हा तुझा अखेरचा निर्णय?”

“होय. ”

“ मग आत्ता या क्षणापासून आपले संबंध संपले. परत भेटू नकोस. ” असे म्हणत ती रागाने उठली आणि ताडताड चालत निघून गेली.

“ अरे समीर, ती चालली, थांबव तिला. ”अजय कळवळून म्हणाला.

“ जाऊ दे. बरे झाले तिची ही वृत्ती आत्ताच कळली, जी इतक्या साध्या गोष्टीत साथ देऊ शकत नाही, डोक्यात राख घालते ती जीवनात काय साथ देईल?”

“ अरे, आत्ता ती रागाच्या भरात बोलली असेल नंतर कदाचित पस्तावेल.”

“तेंव्हाचे तेंव्हा बघू. आत्ता आपल्यापुढे त्या व्यक्तीला शोधणे एवढेच महत्वाचे काम आहे. जोवर मी त्याला शोधून काढत नाही तोवर मी स्वस्थ बसणार नाही. ”

“ठीक आहे. तू म्हणशील तसे. ” असे म्हणत अजयने माघार घेतली.

................ *..............

# प्रकरण ४

दुसऱ्या दिवसापासून दोघांनीही जवळपासची सर्व हॉस्पिटलस् पालथी घातली. चार दिवस, खूप तपास करून पण हाती काहीच लागले नाही. त्यामुळेच की काय समीरची चिडचिड फारच वाढू लागली. मनात एक कुशंका आल्याने १५ तारखेपासूनचे सर्व पोस्ट मार्टम, मृत्यु नोंदणी पण तपासल्या. तरीपण हाती काहीच लागले नाही. चार दिवस दोघांचेही हेच काम चालले होते. त्यातही समीरवर दुहेरी ताण होता. घरी वडीलांकडे पण लक्ष द्यावे लागत होते. वडीलांना याची काही कल्पना येऊ नये याकरता तो आटोकाट प्रयत्न करत होता म्हणजे त्याची तशी कल्पना होती. त्यातही समाधानाची गोष्ट म्हणजे अविनाशची प्रकृती झपाट्याने सुधारत होती. समीरने कितीही प्रयत्न केला तरी त्याचा तणाव त्याच्या आईवडिलांच्या लक्षात आला होता. त्यामागचे कारण लक्षात न आल्याने ते पण अस्वस्थ होते. अविनाशला तर वाटत होते की आपल्यामुळे त्याची परीक्षा हुकली म्हणून समीर नाराज आहे. तसे त्याने दिनूमामाकडे बोलून दाखविले. तसे काही नसावे असे दिनूमामाला वाटत होते. असतील मित्रांमधली काही नाराजी, रुसवे फुगवे असे त्याचे मत होते. अविनाश घरी आल्यानंतर मीना एकदाही फिरकली नव्हती यावरून त्याने हे मत बनविले

होते. खरे म्हणजे समीर आणि अजय घरी येण्याआधी त्यांची आपसात हीच चर्चा चालू होती. हे दोघे येताच अविनाशनेच पुढाकार घेतला.

“या ढवळ्या पवळ्यांनो. ”

“अहो काहीतरी काय बोलता? ते काही लहान नाही आता. ” राधाबाई म्हणाल्या .

“म्हणू द्या हो आम्हाला त्याचे काही वाटत नाही. ”अजय म्हणाला.

“एवढ्या कोणत्या महत्वाच्या विषयावर ही मीटिंग चालू होती ?” समीरने विचारले.

“बरे झाले तूच विषय काढला. ” अविनाश म्हणाला, “ तुझे एवढ्यात काही बिनसले आहे काय?”

“नाही तर. तुम्हाला का तसे वाटते?”

“ पहिलेसारखा तू हसतखेळत नाही. सतत विचार करत असतो. तुझी परदेशवारी हुकली म्हणून नाराज आहे काय ?”

“काहीतरीच काय मामा. तसे काहीही नाही. परदेशीच जायला पाहिजे असे काही नाही. आता प्रत्यक्ष कामालाच सुरवात करावी असे म्हणतो. त्याचाच विचार करत असतो. ”

“तसे असेल तर ठीक आहे. तू थोडा वेगळा अनुभव नाही तर वेगळ्या क्षेत्रातला अनुभव घ्यावा असे मला वाटते. ”

“ म्हणजे ?”

“या दिनूचा एक मित्र जरा अडचणीत आहे. त्याला चांगला ॲडमिन ऑफिसर पाहीजे आहे. मला वाटते एक अनुभव म्हणून तू हे काम करावे. ”

“ पण तुम्ही इथे एकटेच. ”

“ त्याची काळजी करू नको. तू आतापर्यंत कंफर्ट झोनमधे काम केले आहे. वेगळ्या ठिकाणी, वेगळ्या क्षेत्रात काम केले तर तुलापण चांगला अनुभव मिळेल. ”

‘अच्छा म्हणजे हे दिनूमामाचे डोके दिसते’अजय मनात म्हणाला. वरकरणी तसे काही न दर्शविता त्याने मामाला माहिती विचारली.

“अरे आमच्या शिक्षण संस्थेनी इथे जवळच रेवापूरला शाळा सुरू केली आहे. शाळा तशी जुनी आहे पण मधल्या काळात फार दुर्लक्ष झाल्याने सध्या कशीबशी सुरु आहे. आता संस्थेनी मनावर घेतले आहे. किशोर पाठक म्हणून माझा एक मित्र आहे. चांगला नावाजलेला शिक्षणतज्ञ आहे तो. त्याला प्रिंसिपॉल म्हणून नियुक्त केला आहे. त्याला काही विद्यमान सभासद मनासारखे काम करू देत नाही. ”

“कोण म्हणाला तू? किशोर पाठक?” मामाला मधेच थांबवत समीर म्हणाला, “हे नाव तर शिक्षणक्षेत्रात फार प्रसिद्ध आहे. ते रेवापूरसारख्या ठिकाणी कसे काय यायला तयार झाले ?”

“ तुला माहिती आहे हे बरेच झाले. त्याला असे चॅलेंजिंग काम फार आवडते. त्याला काय करायचे आहे हे तोच जाणे. तू फक्त ॲडमिनची बाजू

सांभाळ. स्टाफ पण जुना आहे. ती बाजू तो सांभाळेल. बाकी सर्व त्यालाच विचार. ”

समीरने विचार केला. तसेही रेवापूर दोन तासाच्या अंतरावर होते. जाऊन बघूया. नाही आवडले तर परत येऊ.

“ मामा, मी तयार आहे, सांग केव्हा जाऊ ?”

“उद्या. ”

समीरने बाबांकडे बघितले . त्यांनीही संमतीदर्शक मान डोलावली. म्हणजे हे आधीच ठरले होते तर समीर मनात म्हणाला. त्याने अजयकडे बघितले. अजयने नजरेनेच होकार दिला आणि दोघेही बाहेर पडले. बाहेर पडताच अजय स्वतःहूनच म्हणाला,

“ समीर,इथे शोधून ती व्यक्ती काही अजून सापडत नाही, तू जरा डोके शांत ठेव आणि रेवापूरला जा. मला इथे काही कळले तर मी तुला कळवेन आणि इथली काही काळजी करू नको. आता जास्त ताणले तर यांना सर्व सांगावे लागेल. जे होत आहे ते पण एकप्रकारे ठीकच आहे. त्याला आपण शोधून काढूच. ”

“ पण तो भेटेपर्यंत माझी बोचणी काही कमी होणार नाही. ” समीर खिन्नपणे म्हणाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी जायचे त्याने नक्की केले. बॅग भरायला सुरवात केली तोच आतून आईचा आवाज आला. “अरे समीर जरा खाली येतोस का? बघ तुला भेटायला कोण आले आहे ते ?”

तो हॉलमधे आला. बघतो तर काय, मीना तिच्या आईवडिलांसह आली होती. त्याला बघताच मीनाने ‘हाय समीर काय चालले आहे’अशी विचारणा केली .

आता ही काही अधिक स्पष्ट बोलली तर काय घ्या या भीतीने समीर काही बोलणार तोच तिचे वडील म्हणाले,“अरे समीर,सर्वप्रथम तुला भेटूनच नंतरच बोलणी करायची असा मीनाने हट्ट धरला, म्हणून आम्ही सर्वच आलो बघ. ”

“ कसली सुरवात ?”

“ मीनाचे लग्न ठरतेय. ”मीनाची आई म्हणाली.

“अभिनंदन मीना. ”समीर म्हणाला. का कोण जाणे त्याला सुटल्यासारखे वाटत होते.

मग त्यांच्या आईवडिलांच्या मुलगा कोण,कुठला, काय करतो या रुटीन गप्पा सुरु होताच समीर वळून खोलीकडे निघाला तोच मीना म्हणाली.

“ तू अजूनही हो म्हण. ”

कळून न कळल्यासारखे समीर म्हणाला, “ कशाला ?”

एक निःश्वास सोडून मीना म्हणाली,“ तुझा हट्ट सोडायला तू अजून तयार नाही ?”

“नाही. ”समीर ठामपणे म्हणाला,

“ठीक आहे. लग्नाला जरूर ये. ” असे म्हणून ती गेली. ती गेलेल्या दिशेने समीर काही क्षण बघत राहीला. नंतर जणू काही डोक्यावरचे ओझे उतरल्यासारखे त्याला वाटले व तो बँग भरू लागला.

................ *..............

# प्रकरण ५

समीर रेवापूरला सकाळी दहा वाजता पोचला. त्याची कल्पना होती तसे काही रेवापूर लहानसे गाव नव्हते. सहज ४-५ लाख लोकसंख्या असलेले ते एक टुमदार शहर होते. शहरावरील शैक्षणीक आणि सरकारी छाप जाणवत होता. जवळपास दहा बारा शैक्षणीक संस्था आणि त्यांची शाळा कॉलेजे तसेच होस्टेल आणि विद्यार्थ्यांकरिता असलेल्या खानावळी त्याचे प्रमाण होते. तसेच विविध सरकारी कार्यालये, त्यांच्या पाट्या, कार्यालयात जाणाऱ्या कर्मचाऱ्यांची धावपळ हे बघून समीरला जरा गंमत वाटली. शाळा सुरू झाल्यावर कदाचित आपण या गर्दीतले एक होऊ या कल्पनेने त्याला हसू फुटले. शाळा किती दूर आहे याची कल्पना नसल्याने त्याने एका रिक्षाला हात केला. रिक्षा थांबल्यावर त्याने रिक्षावाल्याला विचारले, “राजा राममोहन स्कूल. ”

रिक्षावाल्याने काहीही अर्थबोध न झाल्याने काय म्हणून विचारले. त्याने परत प्रश्न विचारला.

“ हे कुठे आहे मला माहित नाही. ” रिक्षावाला म्हणाला.

“जिल्हा कोर्टाच्या जवळ. ”

“हा ती शाळा होय. मग आर आर स्कूल म्हणा की. बसा. ” रिक्षा सुरु होताच रिक्षेवाल्याची टकळी सुरू झाली.

“ अॅडमिशन साठी आलात काय ?” उत्तराची अपेक्षा न करता तोच पुढे म्हणाला, “त्या शाळेत काही दम नाही बघा. त्यापेक्षा राठी हायस्कूल बघा. आपल्या ओळखी आहेत तिथे. कोण लहान भावाकरता बघताय काय?”त्याचा भडिमार सुरू झाला. तेवढ्यात कोर्ट आले आणि समीरची सुटका झाली. शाळा बाजूलाच होती. सुटकेचा निश्वास सोडून समीर उतरला. शाळेची इमारत जुनी आणि प्रशस्त होती. जुन्या लाल विटांचे बांधकाम होते. बाजूलाच फुटबॉलचे मैदान होते. समोरच्या बाजूला बराच मोठा बगीचा होता. इमारतीचे रंगकाम चालू होते. अर्ध्यापर्यंत रंगकामाकरता लागणाऱ्या शिड्या लावलेल्या दिसत होत्या पण काम करतांना मात्र कोणी दिसत नव्हते. शाळेच्या ऑफिसमधे मात्र थोडीशी हालचाल जाणवत होती तसेच टिचर्स रूममधे पण काहीजण येजा करतांना दिसत होते. दुसऱ्या बाजूला सायकल स्टँड होता त्यात तुरळक दुचाक्या दिसत होत्या, बहुधा स्टाफच्या असाव्यात. बागेत एक मध्यमवयीन व्यक्ती झाडांना पाणी घालत होता. समीर या व्यक्तीजवळ गेला आणि त्याने हळूच विचारले की प्रिंसिपाल पाठक यांना भेटायचे आहे. कुठे भेटतील? त्या व्यक्तीने काम थांबवले आणि इमारतीकडे हात करून तो म्हणाला, “तळमजल्यावर त्याचे ऑफिस आहे. तिथे बसा. दहा मिनिटांनी भेटतील. ” समीरने त्याप्रमाणे ऑफिस शोधले आणि तो वाट बघू लागला. बरोबर दहा मिनिटांनी तीच व्यक्ती आली सरळ ऑफिस मधे गेली आणि समीरला आतून “आत या’ असा आवाज आला. समीर आत जाऊन बघतो तर तीच व्यक्ती प्रिंसिपॉलच्या खुर्चीत

बसली होती. समीर जरासा वरमून म्हणाला, “सॉरी सर. मी तुम्हाला मघाशी ओळखले नाही. ”

“ सॉरी कशाबद्दल? तुम्ही काही मला आधी बघितले नव्हते. आणि तुम्ही समीर देशपांडे आहात काय?” ते मिश्किलपणे म्हणाले.

“होय. ” समीर आपली फाईल त्यांना देत म्हणाला.

“कालच दिनूचा फोन आला होता. ” फाईल चाळत ते म्हणाले. “ पण तुमचा बायोडाटा बघता तुम्ही या कामाकरता ओव्हरक्वालीफाईड वाटता. ”

“काही हरकत नाही. मला फक्त अनुभव घ्यायचा आहे आणि प्लिज तुम्ही मला अहो जाहो करू नका. ”

“ मग ठीक आहे. तशीही ही जागा तात्पुरती आहे. ”

“सर, एक विनंती आहे ?”

खुर्चीत मागे रेलून त्यांनी प्रश्नार्थक चर्या केली.

“ माझे क्वालिफिकेशन आणि घरची माहिती गोपनीय असावी असे मला वाटते. ”

“काही खास कारण?”

“ विशेष काही नाही. पण ते कळले तर मला नकळत वेगळ्या प्रकारे वागविल्या जाईल. ते मला नकोय. ”

“ ठीक आहे. मी विजयला बोलावले आहे. तो तुला सर्व माहिती देईल. ”

तेवढ्यात विजय आलाच. सरांनी विजयची ओळख करून दिली.

“ हे तुझे नवीन साहेब. तू यांना शाळा दाखव काम समजावून सांग आणि अकराच्या मीटिंगला घेऊन ये म्हणजे सर्वांशी ओळख होईल. ”

ठीक आहे म्हणत विजयने समीरशी हस्तोलंदन केले आणि दोघेही बाहेर पडले. विजय काळासावळा, किंचित स्थूल मध्यम उंचीचा चष्माधारी, पस्तीसच्या दरम्यानचा आनंदी प्राणी होता. आणखीन एक विशेषता म्हणजे तो प्रचंड उत्साही होता. आणि मनमोकळा होता. त्याने स्वतःहून बोलायला सुरुवात केली.

“ प्रथम शाळेची थोडी माहिती शाळा दाखवतांना देतो. ” चालता चालता तो बोलू लागला. “ एकंदर विद्यार्थी सातशे आहेत लोअर केजी आणि अप्पर केजी धरून. शाळेचे टायमिंग सकाळी आठ ते साडेतीन आहे अर्थात स्टाफचे सात ते पाच आहे. एकंदर शिक्षक साठ आहेत. मदतनीस, सहाय्यक पण तेवढेच आहेत. आपले मुख्य काम ,प्रवेश,फी, बिल्डिंग मेंटेनन्स हे आहे. ” नंतर त्याने हळूच पुस्ती जोडली.

“बरे झाले सर तुम्ही आलात माझी फारच धावपळ व्हायची हो. ”

“ का बरं ?”

“ अहो ऑफिसची कामे, बाहेरची कामे दोन्ही सांभाळतांना फारच दमछाक होते हो. ”

याला प्रत्येक वाक्याच्या शेवटी’हो’म्हणायची सवय दिसते. समीर मनात म्हणाला. पण माणूस मनमोकळा होता. कोणताही आडपडदा न ठेवता माहिती देत होता.

“मला समीर म्हणाला तरी चालेल मी पण विजय म्हणालो तर चालेल ना?

“ धावेल” म्हणत तो पुढे सांगू लागला.

“ही शाळेची बाग. तू येताना बघितली असेल पण माळी गायब आहे हो आणि हे फुटबॉल ग्राउंड. बाजुलाच आहे ते आपले ऑफिस . ही टिचर्स रूम, हा कॉन्फरन्स हॉल, तीस वर्ग आहेत पंधरा वरच्या मजल्यावर. रंगकाम चालू आहे पण पूर्ण होईल असे वाटत नाही हो. ”

“ का ?”

“कॉन्ट्रॅक्टर दर वाढवून मागत आहे. ”

“असे मधेच कसे वाढवणार ?”

“तोच तर प्रॉब्लेम आहे हो. समजा वाढवून जरी दिले तरी काम हाईल याची खात्री नाही हो. ”

एव्हाना शाळेला पूर्ण राउंड मारून झाला होता. कॉम्पाउंड वॉलपण बऱ्याच ठिकाणी ढासळली होती. लोक सर्रास जाणे येणे करत होते. शाळेचे पार्किंग वापरत होते. तिकडे बोट दाखवून समीरने विचारले, “याचे काय?”

“सेक्युरिटी ठेवणार आहे. ”

शाळेसमोरील कॉम्पाउंड जवळ चहा, वडापावच्या गाड्या यांचा कोलाहल सुरु होता. कोर्टात येणारे लोकांची गर्दी दिसत होती.

“ हा दंगा?”

“आम्ही तक्रारी करून थकलो हो. पण हे काही हटत नाही हो,

एव्हाना अकरा वाजले होते म्हणून ते दोघेही कॉन्फरन्स रुमकडे गेले. तिथे पाठक सर लगबगीने येतांना दिसले. हे दोघेही दिसताच त्यांनी बरोबर येण्याची खूण केली आणि तिघेही एकदमच आत गेले.

आत कॉन्फरन्स टेबलभोवती वीस शिक्षक बसले होते. भिंतीलगतपण खुर्च्या होत्या. टेबलाभोवती चार खुर्च्या रिकाम्या होत्या. सरांच्याजवळ दोन खुर्च्या रिकाम्या होत्या. हे तिघेही आत येताच सर्व उठून उभे राहिले आणि'सुप्रभात सर, म्हणाले. सरांनी पण सुप्रभात म्हणत सर्वांना बसण्याची खूण केली. विशेष प्रस्तावना न करता त्यांनी समीरची ओळख 'हे आपले नवीन ॲडमिन ऑफिसर'अशी करून दिली आणि बसलेल्या सर्वांची क्रमाने ओळख करून दिली. गणित, सायन्स, इंग्रजी, संस्कृत,मराठी,हिंदी, भूगोल या प्रमुख विषयाचे एक वरिष्ठ आणि दोन कनिष्ठ अशी साधारण विभागणी होती. व्हॉईस प्रिंसिपल शहाणे पण उपस्थित होते. त्यांनी माहिती दिली की चार शिक्षक रजेवर आहेत आणि स्पोर्टस शिक्षकाची जागा अजूनही रिकामी आहे. त्याकरिता मी पाठपुरावा करत आहे. बघू परत आठवण करतो असे म्हणत त्यांनी सर्वांना उद्देशून विचारले की १५ मेला निकाल ठेवल्यास कोणाला काही अडचण आहे काय?

परत व्हाईस प्रिंसिपॉल म्हणाले, “आमची काही हरकत नाही पण त्याच्या आत रंगकाम पूर्ण झाले तर हे शक्य आहे. नाही तर पालकांना बसायला पण जागा नाही. ”

“समीर जॉईन होऊन दोन तास झाले आहेत तेव्हा आपण त्याला थोडा वेळ देऊ या. समीर तीन दिवसात तुझा अंदाज सांग. ”

“ ठीक आहे सर. ”

तेवढयात सरांचा मोबाईल वाजला. व्हाईस प्रिंसिपल शहाणे यांना प्लिज कन्टीन्यू म्हणत ते बाहेर गेले. ते बाहेर जाताच आतापर्यंत गप्प बसलेले शिक्षक ताबडतोब बोलू लागले.

“ १५ ला निकाल लावणे अशक्य. ” गणिताचे परांजपे.

“त्याच्या आत रंगकाम होणे तर त्याहून अशक्य. ” भूगोलाचे शेळके.

“आमचे अजून पेपर तपासून व्हायचे आहेत. ” मराठीचे पाटील.

‘हो,हो’किंचित त्रासून व्हाईस प्रिंसिपल, म्हणाले, “आता समीर तीन दिवसांत त्याची तारीख सांगेल त्यानंतर आपण ठरवू. ”

“मग ठीक आहे. समीर आता तुझ्यावर आम्ही अवलंबून आहोत बर का. ”संस्कृतचे काटे गमतीने म्हणाले. नंतर कोणाचे काही पॉईंट नसल्याने मीटिंग संपली. बाहेर येताच विजय म्हणाला,

“हे रंगकाम कसे होईल हे मला तर कळेनासे झाले आहे. ”

“जो कॉन्ट्रेक्टर सोडून गेला त्याला फोन करून बोलव. ”

“बोलावतो पण काही उपयोग नाही. आधीपण दोनतीन वेळा येऊन गेला आहे. ”

“अजून एकदा बोलव. ”

“ ठीक आहे. ”

एव्हाना ते त्यांच्या ऑफिसपर्यंत आले होते. ऑफिस पूर्ण रिकामे होते. समीरने प्रश्नार्थक मुद्रेने विजयकडे बघितले.

“ लंच टाईम . ”

“अरे हो. मला लक्षातच आले नाही. ”

बऱ्याच दिवसांनी वेगळ्या कामात रमल्याने त्याला मोकळे वाटत होते पण बोचणी काही कमी होत नव्हती. कोण होता तो आणि त्याचे काय झाले असेल हा विचार वेळ मिळताच डोके वर काढतच होता.

“तू ये जेवून. ”समीर विजयला म्हणाला.

“आणि तू?”

“मी जाईन नंतर. ”

“असे कसे ? माझ्यापण लक्षात आले नाही. तुझी जेवण्याराहण्याची काही सोय झाली आहे का?”

“नाही. ”

“मग चल. आपण बाहेर जेवायला जाऊ. इथे जवळच आशियाना म्हणून चांगले हॉटेल आहे तिथेच जाऊ. ”

जेवतांना विजयने त्याला सुचविले की सध्या शाळेचे सेक्युरिटी क्वार्टर रिकामे आहे. सरांना विचारून तिथे तात्पुरती राहण्याची सोय होऊ शकते.

जेवणाची जबाबदारी अर्थात विजय घेणार. समीरला होकार देण्यावाचून काही पर्याय नव्हता.

ऑफिसमधे परतल्यावर त्यांना दाराशीच एक धिप्पाड काळासावळा माणूस भेटला. एका सात आठ वर्षाच्या मुलीने त्याचा हात घट्ट धरला होता. समीरने सहजच काय काम आहे हे विचारले.

“या मुलीला दुसरीत दाखल करायचे होते. ”

समीरला ही भाषा नवीन होती पण विजयला नव्हती.

“दाखला आणला?” इती विजय.

त्याने एक चार घड्या पडलेला एक जीर्ण कागद बाहेर काढला आणि विजयला दिला.

“ चालणार नाही. ”

“ का बरं सायबा ?”

“याच्यावर शाळेचा शिक्का नाही. ” तो कागद समीरकडे देत विजय म्हणाला. समीरने नीट बघितले. खरच शिक्का नव्हता. समीर त्या माणसाला तो कागद परत देत म्हणाला, “बाबा शिक्का आणा. ”

“कसा आणू सायबा? मी कामाकरता गावोगाव फिरणारा माणूस. एकदोन वेळा गेलो पण मास्तर गावेना. आता काय कराव म्हणून इथे आलो. ”

“ बाबा तसे कसे चालेल, आम्हालापण नियम पाळावे लागतात. ”विजय निर्धाराने म्हणाला.

“ मग काय पोरीचं वरीस वाया गेलच म्हणायच. ” असे तो माणूस निराशेने म्हणाला.

“ बाबा ही शाळा छान आहे. मला आवडली. मी इथेच शिकेन. ” ती चिमुरडी म्हणाली. हे ऐकताच समीर हेलावला आणि परत कागद हाती घेत म्हणाला,

“ चला माझ्या बरोबर. ”

त्या दोघांनाही घेऊन तो पाठक सरांकडे गेला. अर्थात विजय बरोबर होताच.

सर्व घटना त्यांना सांगून म्हणाला, “ सर यात काही करता येईल का?”

“विजयचे म्हणजे रास्त आहे. ”

“सर नियम वगैरे ठीक आहे पण शिक्का महत्वाचा की शिक्षण ?”

सरांनी चमकून वर बघितले. त्याबरोबर समीर वरमून म्हणाला,

“ सॉरी सर. ”

सर शांतपणे हसले आणि त्या माणसाला म्हणाले, “तुमचे काय नाव?”

“धर्माप्पा सायबा. ”

“बरे तर तुमच्या मुलीला प्रवेश मिळेल पण तिची परीक्षा आमचे एक शिक्षक घेतील त्यानंतर. ठीक आहे?”

"चालेल. ” तो आनंदाने म्हणाला. सरांनी विजयकडे कागद दिला,

“ सुर्वे सरांना हिची परीक्षा घ्यायला सांगा. ”

“ केंव्हा ?”

“आत्ता, आणि धर्माप्पा, शाळेची फी नियमीत भरायची बरं का ?”

“ सायबा, वर्षाची आत्ताच भरतो. ”

“मग ठीक आहे, आपण येऊ शकता. ”

चौघेही जायला निघाले. काहीतरी लक्षात आल्याने समीर परत फिरला आणि सरांना मनापासून म्हणाला, “ सर धन्यवाद. ”

सर काहीतरी लिहिण्यात मग्न होते. त्यांनी डावा हात किंचित झटकल्यासारखे केला पण समीर उभाच आहे असे जाणवल्याने म्हणाले, “अजून काय?”

“सेक्युरिटी क्वाटर्समधे मी तात्पुरता राहू शकतो काय?”

क्षणभर विचार करून ते म्हणाले, “शाळा सुरू होईपर्यंत. ”

ऑफीसमधे पोचल्यावर त्याला विजय समोर एक माणूस मोठमोठ्याने बोलतांना दिसला.

“ माझ्या झाल्या कामाचे पैसे टाका आणि रेट वाढवून द्या तरच पुढच्या कामाचे बोला. ” तो रुबाबात बोलत होता. समीरला बघताच विजयला हायसे वाटले.

“हे बघा सर आले. आता त्यांच्याशीच बोला. समीर हे शिवाप्पा आपले रंगकामाचे ठेकेदार. ” विजय म्हणाला

समीर एक खुर्ची ओढून विजय जवळ बसत म्हणाला, “काय शिवाप्पा तुमचे म्हणणे तरी काय ?”

शिवाप्पाने परत धमकी जाहीर केली.

“समजा तुमचे आतापर्यंतचे पैसे दिले आणि दर वाढवून दिला तर काम केव्हा सुरु करणार?”

शिवाप्पाचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. हे पोरग तर दुधखुळ दिसते. आपले रंगारीच आपल्याकडे काम करायला तयार नाहीत हे याला माहित नसावे किंवा या विज्याने याला सांगितले नसावे असा विचार करून तो म्हणाला, “उद्यापासून. ”

“ठीक आहे, विजय यांचे झाल्या कामाचे किती पैसे होतात? ”

“ वीस हजार पण पैसे दिल्यावर हा काही आपल्याला दिसणार नाही. ” विजयने सावध करण्याचा प्रयत्न केला.

“तुला माणसाची पारख नाही. चेक दे. काही थकबाकी येणे नाही अशी त्यांच्याकडून पावती घे. ”

विजयने कुरकुरतच चेक दिला आणि थकबाकी शिल्लक नाही अशी पावती केली. शिवाप्पाने त्यावर झोकात सही केली. समीरने शिवाप्पाला चेक दिला आणि उद्यापासून काम सुरु व्हायला पाहिजे म्हणून बजावले. तुम्ही अजिबात काळजी करू नका चेक खिशात टाकत शिवाप्पा म्हणाला आणि वेगाने बाहेर पडला.

“ समीर काय केले हो. हे याचे अंतिम दर्शन. हा काही आता परत दिसणार नाही. ” त्याकडे साफ दुर्लक्ष करत समीर म्हणाला, “यांची माणसे कुठे राहतात हे कळू शकेल?”

“प्रताप गार्डनच्या बाजूला त्यांना तात्पुरती जागा दिली आहे. ” विजय म्हणजे माहितीचा खजाना होता.

“संध्याकाळी सहानंतर आपण तेथे जाऊ. ”

तेवढ्यात शिपाई आला व त्याने दोघांनाही टीचर्सरूममधे चहा करता बोलावले आहे असे सांगितले, तेथे जाताच त्यांना धर्माप्पा मुलीसहीत बाहेर येतांना दिसला. समीरला बघताच त्याने नमस्कार केला. तो काही बोलायच्या आतच समीर त्याला म्हणाला, “ झाले ना काम?”

“ होय सायबा लई.... ?” ते राहू द्या म्हणत दोघेही आत शिरले

“ये समीर. ” सुर्वे सरांनी स्वागत केले. “अरे सकाळी तुझी जेवण्याराहण्याची काहीच विचारणा केली नाही. रियली सॉरी. तसा विजय बरोबर असल्याने काळजी नव्हती म्हणा. ”

“सध्याची तरी व्यवस्था झाली आहे. ” समोर आलेला चहाचा कप घेत समीर म्हणाला.

“मग ठीक आहे. ” तेवढ्यात समीरचे लक्ष रूमच्या एका भिंतीवर गेले. तिथे ओल होती.

“ हा कसला पॅच?”

“ हे आतापर्यंत झालेल्या रंगकामाचे फलीत. ”

“म्हणजे आतापर्यंत पाच वेळा रंग दिला पण ही ओल काही जात नाही. ” दिक्षीत सर म्हणाले, “तुझा नंबर सहावा. ”

“ ठीक आहे. चॅलेंज ॲक्सेप्टेड. ” समीर हसून म्हणाला आणि त्याने खिशातून मोबाईल काढून आठ दहा फोटो काढले.

“अहो सर, त्याला आल्या दिवसापासून का छळताय?” भूगोलचे ढोबळे सर म्हणाले.

“नाही तर काय? तो पळून गेला तर दुसरा मिळेपर्यंत ओरडत बसावे लागेल.” हिंदीचे शामजी सर म्हणाले.

त्यांचे ही आपसातले बोलणे ऐकून समीरची करमणूक होत होती पण राहून राहून त्याच्या डोक्यात एकच विचार येत होता, त्या व्यक्तीचे काय झाले असेल?’

पाच वाजता विजयने आठवण करून दिली.

“समीर आपल्याला प्रताप गार्डनला जायचे आहे ना?”

“ होय. आपण तेथे सात वाजता पोचायला हवे. ” आता हीच वेळ का वगैरे विचारायच्या फंदात विजय पडला नाही, तसेही धर्माप्पाच्या मुलीच्या प्रवेशा करिता समीरने सरांशी पण बोलायला कमी केले नाही हे बघून त्याच्या लेखी समीरची किंमत फार वाढली होती.

“तिथून माझे घर जवळ आहे. नंतर माझ्याकडेच जेवायला जाऊ. ”

“ठीक आहे. ”

................ *..............

# प्रकरण ६

ठरल्याप्रमाणे दोघेही सात वाजता प्रताप गार्डनजवळील रंगाऱ्याच्या वस्तीवर गेले. तेव्हा बरेचजण त्यांचे दिवसाचे रंगकाम आटपून परत येत होते. या दोघांना बघताच एक दोघांनी स्वतःहून कोण पाहिजे असे विचारले.

“शिवाप्पाकडे काम करणाऱ्यापैकी कोणी भेटेल काय?” समीरने विचारले. झाले. एवढ्या एका प्रश्नाने शांत डोहात कोणी मोठा धोंडा टाकावा तसा गलका सुरू झाला. ज्याला विचारले त्याच्यासह जेवढ्या लोकांना शिवाप्पा नाव ऐकू आले होते ते सर्व इतके संतापले की आठ दहा जणांनी समीर आणि विजयला घेराव घातला आणि गलका सुरु झाला. भाषापण कानडीमिश्रित मराठी होती. ते समीरला काही कळेना. सर्वजण एकदमच ओरडत होते. समीरने शांत व्हा, शांत व्हा, एकेकानी बोला असे दोनतीनदा म्हणून बघितले. परिणाम शून्य. जे काही थोडेफार समीर समजू शकला ते एवढेच की शिवाप्पा हा चोर, बदमाश माणूस आहे, त्याने या लोकाचे पैसे बुडविले आहेत. त्याचे नाव जो कोणी घेईल त्यालापण मारले पाहिजे यावर त्यांचे एकमत होते.

तेवढ्यात काय कल्ला चालू आहे म्हणून येणारा एक व्यक्ती त्या घोळक्यापाशी आला. त्याला बघताच सर्वजण सर्वांचा आवाज जरा कमी झाला. बहुतेक त्यांचा म्होरक्या असावा आणि तो विजयला ओळखत असावा

विजयला बघून त्याने आश्चर्याने विचारले, “ काय वो विजयसायेब ? तुम्ही इथे कशापायी आला?”

विजयला जणू देव भेटल्यासारखे वाटले. “ अहो बघा ना भगवंतराव. आम्हाला शिवाप्पाकडे काम करणाऱ्यापैकी कोणालाही भेटायचे होते हो. पण हे काही ऐकतच नाही. ”

भगवंता लगेच त्या लोकावर ओरडला. त्यासरशी त्यांच्यापैकी एकाने सांगितले की शिवाप्पाकडे आता कोणी काम करत नाही कारण परत तेच सगळे. आता त्यात अजून एका वाक्याच भर पडली की तो आम्हाला घरी रंग नेऊ देत नाही. “म्हणजे काय?” समीरने विचारले.

“रंगकाम झाल्यावर डब्यात जो थोडा रंग शिल्लक राहतो तो सर्व रंगारी घरी नेतात आणि त्यातून छोटी कामे करतात पण शिवाप्पा त्यांना असा रंग नेऊ देत नाही. ” भगवंत हसून म्हणाला.

आता या बहुमोल माहितीचा आपल्याला काय उपयोग असे समीरला वाटले पण तसेच रेटून त्या भगवंताला म्हणाला, “ शिवाप्पा काम अर्धवट सोडून पळाला आहे. तुमच्यापैकी कोणी ते पूर्ण करायला तयार आहे काय?”

विजयचे डोळे विस्फारले. हा गडी तर फारच तयारीचा दिसतो. या प्रश्नाने तिथले वातावरण पूर्ण बदलले. परत त्यांचा गलका सुरु झाला पण तो आता आपसात होता. परत भगवंतानी सूत्रे हातात घेतली. त्यांच्यावर त्यांच्या भाषेत ओरडला. दहा मिनिटांनी तो समीरला म्हणाला, “सध्या हातात कामे आहेत. तीन दिवसात मधे एकदा भेटून ठरवू. ”

“ मे १० च्या आत काम पूर्ण करायचे आहे. ”

“ त्याची काळजी करू नका. बहुतेक जणानी तिथे आधी काम केले आहे. त्यामुळे तुम्ही म्हणाल त्या तारखे आधी काम होणार म्हणजे होणार. ” तेवढ्यात चहा आला आणि परत एकदा डिटेलमधे बोलू असे भगवंताने सांगितले. साक्षात भगवंतानेच आश्वासन दिल्यावर कोण काय बोलणार? नंतर ते दोघेही विजयकडे जेवायला गेले. सेक्युरिटी क्वार्टर विजयने दुपारीच सज्ज करून ठेवले होते. परतल्यावर समीरने जी ताणून दिली ते दुसऱ्या दिवशी आठ वाजेपर्यंत.

दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर त्याने प्रथम टिचर्सरुमच्या ज्या भिंतीवर ओल आली तिचे आतल्या व बाहेरच्या बाजूने फोटो घेतले. अजयला मेल केले. काय कारण असेल तसेच काय करायला पाहिजे हे विचारले. अजयच्या वडीलांचा हा व्यवसायच होता. त्याचे दहा मिनिटांनी उत्तर आले की आतून बाहेरून रंग पूर्णपणे खरवडून काढ आणि काही भेग दिसते का ते बघ किंवा त्याचे फोटो पाठव. तोपर्यंत एक एक करत सात आठ शिक्षक आले होते. समीर काय करत आहे हे पण ते कुतुहलाने बघत होते. थोड्या वेळाने चहा आला तेव्हा सायन्सच्या पाटील सरांनी आवाज देऊन बोलावले आणि जरा चेष्टेनीच विचारले, “समीर,हल्ली काही मोबाईलवरूनच रंगकाम करायचे टेक्निक आले आहे काय?”

समीरपण त्याच स्वरात उत्तरला, “ प्रत्येक क्षेत्रात तज्ञ असतात. त्यांचा सल्ला घेण्यात मला तरी काही कमीपणा वाटत नाही. ” यावर जमलेले सर्वजण हसले कारण पाटील सरांना असेच खोचक बोलायची सवय होती. त्यांना

कोणीतरी उत्तर देणारा भेटल्याने त्यांनापण बरे वाटले होते. असे उत्तर पाटील सरांना अपेक्षित नव्हते. पण एवढ्यावर गप्प बसतील तर ते पाटील कसले ? ते म्हणालेच, “अशी मेल करून, फोटो पाठवून काम होईल यावर माझा विश्वास नाही. ”

यावर समीरने थोडा विचार केला की फार झाले. यांचे बिल जास्तच झाले आहे. त्यांना समीरने उलट प्रश्न केला, “सर,तुम्ही जपान पाहिला आहे?”

पाटील जरा गडबडले पण म्हणाले, “नाही. त्याचा इथे काय संबंध?”

समीर हसून म्हणाला, “तुम्ही पाहिला नाही तरी जपान आहे ना? तसेच हे समजा. ”

यावर चहावाल्या पोरासकट सर्वजण जोरात हसले.

समीरने सर्वांच्या चहाचे पैसे दिले आणि बाहेर पडला. ऑफिसमधे आला तर विजय त्याची वाट बघतच होता. विजय काही बोलण्याच्या आधी समीरच म्हणाला,

“ शिवाप्पाचा कोणी माणूस कामावर आला नाही आणि शिवाप्पा फोन उचलत नाही हेच सांगणार आहे ना?”

“ हो, पण एवढे माहित होते तर वरती पैसे कशाला दिले हो?”

“ काळजी करू नका. मी शाळेचे नुकसान होऊ देणार नाही आणि शिवाप्पाच तुमच्याकडे चकरा मारेल बघा. ”

“ते कसे हो?”

समीर काही सांगणार तेवढयात भगवंत आला. नमस्कार चमत्कार झाल्यावर तो म्हणाला की किती काम झाले आहे ते बघून येतो आणि नंतर कोटेशन देतो. विजयचे आणि भगवंताचे चांगले जमते असे समीरच्या ध्यानी आले म्हणून तो म्हणाला, “ ते तर कराच पण अगोदर मी सांगतो ते एक काम करा. ”

समीर त्या दोघांना घेऊन टिचर्स रुममधे गेला आणि ओल असलेली भिंत दाखवून म्हणाला, “ हिचा रंग आतून, बाहेरून काढायचा आहे. आज बाहेरून काढा, उद्या आतून. ” काही न बोलता भगवंताने खिशातून मोबाईल काढला

आणि एक माणूस ताबडतोब पाठवा असा निरोप दिला आणि तो विजयबरोबर झालेले काम बघायला गेला.

समीर जाणार तोच दोन शिक्षक आत आले. स्वाभाविकपणे काय कसे आहात वगैरे विचारणा झाली. त्यांनापण समीरची कार्यशैली आवडली आहे असे समीरला जाणवले. एव्हाना मीटिंगची वेळ झाल्याने सर्वजण मिटिंगला गेले. मीटिंग मधे समीरकडे काही पॉइंट नव्हते. त्याने फक्त टिचर्सरुमची भिंत करायला घेतली आहे एवढेच सांगितले.

“छान, निदान काही हालचाल तरी सुरु झाली. ” पाटील म्हणाले . त्यांच्या टोमण्याकडे दुर्लक्ष करीत सरांनी मीटिंग संपविली. ऑफिसमधे पोचल्यावर विजयने भगवंतानी कोटेशन दिल्याचे सांगितले.

“छान. आधीच्या रेटएवढेच आहे ना?”

“थोडे कमीच आहे. पण ते शिवाप्पाला दिलेले वीस हजार कसे दाखवणार?”

“दिले कुठे अजून? भगवंत केव्हा काम सुरु करणार आहे?”

“अजून दोन दिवसांनी आणि १० मे पर्यंत पूर्ण करतो म्हणाला. ”

“मग अजून दोन दिवस शिवाप्पाला रोज फोन कर तो फोन उचलत नसला तरी. भगवंताचे काम सुरु झाल्यावर आपण सरांना रिपोर्ट करू. ”

पण दोन दिवस थांबायची गरज पडली नाही. दुसऱ्याच दिवशी शिवाप्पा तणतणत ऑफिसमधे आला, “ कुठे गेला तुझा साहेब. ”तो विजयवर ओरडला. “कुठे आहेत तुझी माणस?” त्याचवेळी ऑफिसमधे येत समीर म्हणाला.

“तुमचा चेक वटला नाही. खोटे चेक देता होय. मी केस करीन. ”

“तुझी तरी माणस कुठे आहेत आणि काम कुठे सुरु झाले आहे. तुला काय वाटत फुकटचे पैसे मिळतील म्हणून?”

“केलेल्या कामाचे मागतो मी. ”

“ते तुझ्या लोकांना पगार न देता. स्वतःच हडप करायला. ”

“मी काहीपण करीन तू कोण मला विचारणार ?”

“कोणाचे पाचशे, कोणाचे सातशे असे एकंदर वीस हजार तू या लोकांचे देणे आहे. ”एक यादी फडकवत समीर म्हणाला, “आणि हे सर्व इथेच काम करत होते. ”

“तुमचा याच्याशी काय संबंध?”

“ हिच माणस हे काम पूर्ण करणार आहेत. ”

“बघतोच कशी काम करतात. शिवाप्पा म्हणतात मला. ”

“ शहाणा असशील तर या फंदात पडू नको. उद्यापासून शाळेच्या आसपास जरी दिसला तर तंगड्या गळ्यात अडकवीन. ”

“मी कोर्टात जाईन. ”

“लवकर जा. तू अजून किती लोकांना बुडविले आहे ते सर्वच कोर्टात आणायची जबाबदारी माझी. ”

हे ऐकल्यावर मात्र शिवाप्पा तणतणत निघून गेला. बघून होईन, महाग पडेल अशा गर्जना करत निघून गेला. हे सर्व नाट्य विस्मयाने बघणारा विजय शिवाप्पा गेल्यावर समीरला म्हणाला, “समीर शाळेचा चेक रिबाउंड कसा झाला हो ?”

“झाला नाही, केला. मी बँकेला स्टॉप पेमेंटचा मेसेज आधीच दिला होता.”

“आणि ती शिवाप्पाच्या देणेकऱ्यांची यादी तुला कुठून मिळाली?”

“कसली यादी? आता येतांना सुर्वे सरांनी नवीन ॲडमिशनची एक यादी दिली होती तीच मी फडकवली. बघ. ” ती यादी विजयला देत समीर म्हणाला. आता विजयला हसू फुटले. “बराच ड्रामेबाज दिसतो पण जरा संभाळून हो.”

“ काही काळजी करू नको. उलट शिवाप्पाला जरा सांभाळून रहायला सांगा. कारण तो काही करायची मी वाट बघणार नाही. ”

तेवढ्यात भगवंत आला आणि उद्यापासून काम सुरु करणार म्हणाला. विजयने अर्थातच झालेल रामायण त्यांला सांगितले. ते ऐकून भगवंता पिसाळलाच. तो फक्त समीरला एवढेच म्हणाला की साहेब तुम्ही छान केले

आणि कसली काळजी करू नका. तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही. ही माझी जबाबदारी.

“जाऊ द्या हो चला आपण सरांना भेटून काम उद्यापासून सुरू होणार ही सुवार्ता देऊ. ” नंतर ते तिघेही सरांना भेटले. आधी काम करणारेच लोक असल्याने आणि एकंदर खर्च कमीच होत असल्याने ते समीरला ‘गो अहेड’ म्हणाले. बाहेर पडताच समीरने भगवंताला फक्त टिचर्स रुमची भिंत मी जसे सांगेन तशीच पेंट करा एवढेच सांगीतले.

“चला की. आमच्या माणसानी एव्हाना खरवडलीच असेल. ” भगवंता म्हणाला. तेथे पोचताच समीरने बघितले की खरच भिंत पूर्ण खरवडून झाली होती. समीरने बाहेरच्या बाजूने नीट निरखून बघितले. एक बारीक भेग वरपासून खालपर्यंत दिसत होती. तशीच पण जरा कमी रुंदीची भेग आतल्या बाजूला होती. समीरने आतून बाहेरून परत फोटो काढले आणि अजयला पाठवले. भगवंत हे कुतूहलाने बघत होता. तो सहज समीरला म्हणाला, “ साहेब, तुम्ही काळजी करू नका. रंगकामात ही भेग जाईल. ”

“उद्या पहिले इथून सुरवात करू. मी सांगतो ते मटेरियल वापरूनच ही भिंत रंगवायची. ”

“ठीक आहे तुम्ही म्हणाल तसे. आमची माणसे उद्या नऊच्या ठोक्याला येतील. ”

# प्रकरण ७

खरेच दुसऱ्या दिवशी नऊ वाजता कामाला सुरवात झाली आणि समीरला हायसे वाटले. भगवंत स्वतः सगळीकडे लक्ष ठेवीत होता. त्याच्या देहबोलीकडे बघून समीरला हे काम वेळेच्या आधी पूर्ण होईल याची खात्री वाटू लागली. तरीपण मीटिंग मधे त्याने १५ मे पर्यंत काम पूर्ण होईल असेच सांगितले आणि अजयच्या उत्तराची वाट बघू लागला. मेलला उत्तर देण्याऐवजी अजय स्वतःच आला. त्याने मटेरीयल बरोबर आणले होते. त्याला बघताच समीरला आनंद झाला. त्याला वाटले की बहुधा त्या व्यक्तीचा शोध लागला.

“अरे अजय, असा अचानक?”

“हो. म्हटले कोण ती तुझी लाडकी भिंत स्वतःच करावी. ”

“ काहीतरीच काय ? मला वाटले की.. ”

त्याचे वाक्य मधेच तोडत अजय म्हणाला, “ मी विसरलो नाही. रोजच शोध घेत असतो पण तुला भेटायला म्हणून झालो. ”

“आलास ते छानच झाले. चल तुला शाळा दाखवतो. ”

“शाळा काय दाखवतो. सगळीकडे रंगाच्या धुरळा उडाला आहे. ”

“तेही खरेच आहे म्हणा. ही बघ ती प्रसिद्ध भिंत. ”

अजयने भिंत अक्षरशः भिंग लावून तपासली. भगवंताकडून दोन माणसे घेतली. सुरवातीला भेग थोडी मोठी करून घेतली. मग लिकप्रुफिंग केले. परत पुट्टी वापरली तेव्हापण लिकप्रुफिंग मटेरिअल वापरले. दोन पुट्टीचे हात झाल्यावर बाहेरच्या बाजूने सरळ सिमेंट पेंट वापरला आणि आतूनम फिक्सिंग पेंट वापरून दोन दिवसात भिंत पूर्ण केली.

भगवंताला पण हे काय चालले आहे याची उत्सुकता होती त्यामुळे त्याने उत्साहाने मदत केली.

“नुसत्या पुट्टीनेपण काम झाले असते की. एवढा कुटाना कशापायी?”तो समीरला म्हणाला.

“आतापर्यंत पाच वेळा पुट्टी वापरुन पण ओल थांबली नाही म्हणून. ”

“आतातरी गॅरंटी काय ?”

“ ते पाऊस पडल्यावर कळेल. तोपर्यंत दम धरा. ” असे म्हणून समीरने विषय संपवला.

नंतरचे दहा दिवस मात्र भगवंताने असा कामाचा तडाखा लावला की मे दहाच्या आत काम पूर्ण होईल याची समीरला खात्री वाटू लागली. अर्थात त्याने तसे बोलून दाखविले नाही. तशात सरांनी त्यांला बोलावले. समीर येताच त्यांनी काम कुठवर आले याची चौकशी केली. कामाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त करतांना त्यांनी बाकीच्या कामांचे कुठपर्यंत आले आहे हे पण बारकाईने विचारले .

“सर, अजून काही त्याकडे बघायला वेळ मिळाला नाही पण आता जरा सवड मिळताच सुरु करेन. ”

“ ठीक आहे. मला एक अजून छोटे काम लक्षात आले आहे. त्याचीपण सुरवात करावी असे मला वाटते. ”

“ते कोणते?”

“ हे बघ पेंटींग करतांना सर्वच नावांच्या पाट्या काढून ठेवलेल्या दिसतात. त्या पण रंगवायला घे. नाहीतर नंतर त्या शोभून दिसणार नाही. ”

सरांच्या निरीक्षणाचे समीरला कौतुक वाटले.

“खरे आहे सर. माझ्या लक्षातच आले नव्हते. मी बघतो आणि सुरवात करतो. ”

नंतर जेव्हा भगवंताबरोबर हा विषय निघाला तेव्हा हे काम काही सोपे नाही हे त्याच्या लक्षात आले. हे काम करणारे पेंटर वेगळे असतात आणि त्याच्या तंत्राने घ्यावे लागते अशी भगवंतांनी माहिती दिली.

“मग ?”

“शाळेच्या नावाची पाटी सुरु करतो मग तुम्हीच बघा. ”

खरच दिवसभरात फक्त पाटी स्वच्छ झाली तर दुसऱ्या दिवशी फक्त आऊटलाईन. मग मात्र समीर जरा काळजीत पडला. पेंटरला विचारले तर म्हणाला की आठवडा लागेल.

“ आणि बाकीच्या नेमप्लेट्स ?”

“त्याच्यावर चारजण काम करत आहे. त्यालापण महिना लागेल. जर का काम चांगले पाहिजे असेल तर. नाहीतर काय देऊ रेघोट्या मारून. ”

त्याच्याशी विशेष न बोलता समीरने अजयला फोन केला आणि परिस्थिती सांगितली.

“ त्याला मोठे पाटीचे काम त्याच्या गतीने करू दे. तू मला फक्त अक्षरांची लांबी रुंदी आणि काय लिहायचे ते पाठव. आपण कॉम्पुटर एनग्रेव्हींग करू. ”

“ त्यावर होईल?”

“आरामात. प्रथम छोट्या नेमप्लेट्स करू म्हणजे तुझी खात्री पटेल. हा डेटापण कायमस्वरूपी राहील आणि त्यांचा माणूस येऊन चिकटवून जाईल. ”

“अरे याला किती वेळ लागेल?”

“ सर्व काम आठवड्यात संपेल. ”

“ठीक आहे. ”

परत समीरने सर्व नेमप्लेटसचे फोटो काढले, साइज़ घेतली आणि अजयला पाठवले. खरच दोन दिवसांनी अजयनी काही नमुने चेक करायला पाठविले बघताक्षणीच कोणालाही आवडतील अशीच होती ते. निळ्या बॅकग्राउंडवर पांढरी अक्षरे, तीही एकसारखी. फारच सुरेख दिसत होती. शिवाय लावायलाही सोपी. समीरने सरांना ती दाखविली, त्यांनापण ती आवडली आणि एक मोठा प्रश्न सुटला. रंगकाम पूर्ण झाल्यावर सर्व पाट्या लावण्यावर त्यांचे एकमत झाले. तोपर्यंत जे चालू आहे ते असेच चालू ठेवू असे ते म्हणाले.

एक मुख्य प्रश्न मार्गी लागल्यावर समीरने त्याचे लक्ष कंपौंड वॉलकडे वळवले. विजयने त्याबाबत माहिती दिली की रिपेरींगचे काम करणारे ठेकेदार सहसा लहान ठेकेदार असतात. ते एकाच वेळी चार-पाच कामे घेतात. पण हे काम त्यांच्या दृष्टीने जरा मोठे असल्याने अजूनतरी कोणी तयार होत नाही. विजयच्या माहितीवर विश्वास न ठेवण्यासारखे काहीच नव्हते म्हणून समीरने विजयलाच पालकांपैकी कोणी हा व्यवसाय करतो काय याची माहिती काढण्यास सांगितले. त्याप्रमाणे विजयने सर्व माहिती काढली आणि चार नावे समीरला सांगितली. त्यातले एक नाव होते'धर्माप्पा'. समीरने लगेच फोन लावला. "धर्माप्पा, मी समीर, आर आर स्कुलमधून बोलतोय. "

" बोल सायबा, काही ॲडमिशनचा गुंता नाही ना?"

" नाही. मीच गुंत्यात अडकलो आहे. तुमची मदत पाहिजे. "

" काय करु देवा. फक्त सांग. "

समीरने सांगितले. एक मिनिट धर्माप्पा काहीच बोलला नाही. समीरला वाटले की बहुधा याच्या मनात नाही. म्हणून तो म्हणाला, " धर्माप्पा, काही जबरदस्ती नाही. तुम्हाला शक्य नसल्यास... "

वाक्य अर्ध्यातच तोडत धर्माप्पा घाईने म्हणाला,

"नाही. तसे काही नाही. तुम्हाला नाही तरी कसे म्हणणार हो. मी फक्त कसे जमवायचे याचा विचार करत होतो. "

" ठीक आहे. मग उद्या विजयला भेटून फायनल करा. "

“ तुम्ही बिनघोर रावा. ”

“ अजून एक. अॅडमिशनचा आणि या कामाचा काही संबंध नाही तुम्हा परवडत नसेल तर तुम्ही काम नाकारू शकता. ”

दुसऱ्या दिवशी धर्माप्पा हजर झाला.

“ सायबा,मी काम बघितले आणि सुरू पण केले. विजयसायबाकडे सर्व कागद दिलेत. ”

“अरे वा. केव्हापर्यंत पूर्ण करणार ?”

“महिना लागेल. ”

“ठीक आहे. समोरची बाजू पहिले करा. ”

तेवढ्यात भगवंत त्याचे दोन रंगारी,दत्ता आणि संतोष यांना घेऊन आला.

“ ओ साहेब, तुम्हीच जरा या दोघांना समजावा, मी थकलो सांगून. ”

“ काय झाल. ?”

तुम्हीच विचारा म्हणत तो तणतणत निघून गेला. तो गेल्यावर समीरने दोघांनाही बसण्याचा इशारा केला आणि काय झाले ते विचारले. तसे पाहिले तर ते दोघेही समीरच्या वयाचे होते पण भगवंत याला मान देतो तर आपणही द्यायला पाहिजे या भावनेने ते समीरला सांगू लागले.

“ तो शाळेबाहेरचा जय भवानी हॉटेलवाला आहे ना साहेब त्याला फार मस्ती आली आहे. त्याला आम्ही मारणार आहो. ” हा मानापमानाचा प्रकार दिसतो समीर मनात म्हणाला. त्यांच्या सांगण्यावरून एवढेच कळले की हे

हॉटेल वडापाव आणि चहाकरता प्रसिद्ध होते. दोन वडापाव आणि एक चहा घेतल्याशिवाय तिथून कोणी येतच नसे म्हणजे एका माणसाचे चाळीस रुपये बिल होतच असे. दत्ता आणि संतोष या जोडीचा पण हाच दिनक्रम होता. आज मात्र सकाळी तिथे गेल्यावर त्यांनी काहीच घेतले नव्हते कारण बसताक्षणीच भगवंतानी त्यांना ताबडतोब बोलावले. ते लगबगीने जातांना बघून विलास शेट्टीला वाटले की हे बिल न देताच जात आहेत म्हणून त्याने हटकले. तेंव्हा आम्ही काही खाल्ले नाही असे त्यांनी सांगितले. त्यावर सर्वजण असेच म्हणतात असे म्हणत त्याने पोऱ्याला बिल विचारले. आता सकाळी गर्दी खूप असल्याने पोऱ्याने न बघता दुरूनच ऐंशी रुपये म्हणून ठोकून दिले. झाले शब्दाने शब्द वाढला पण विलासने रुपये वसूल केलेच.

“पैशाचा प्रश्न नाहीं साहेब. ” संतोष म्हणाला, “ पण आई बापावर गेल की बेण. ते काही नाही आम्ही त्याला ठोकणार आणि हॉटेल तोड़णार. ”

हेच ते जय भवानी हॉटेल होते ज्याच्या गोंगाटाने शाळेला पण उपद्रव होत होता.

विद्यार्थ्यांना हॉटेलात येऊ देऊ नका, त्यांना मावा गुटखा विकू नका या विजयच्या विनंतीला तुम्हाला तुमचे विद्यार्थी सांभाळता येत नसतील तर शाळा बंद करा असे उर्मट उत्तर देणारा हाच तो विलास शेट्टी होता. हॉटेल होते तर बेकायदेशीर पण कोर्टात केस असल्याने काही करता येत नव्हते. विलासच्या दादागिरीने तर सगळेच त्रस्त होते. आता समीरने समोर आलेल्या संधीचा फायदा घेण्याचे ठरविले.

“तसे केले तर तुम्हाला कमीत कमी दोन वर्षे तरी खडी फोडायला जावे लागेल आणि मारपीट करतांना जर काही बरेवाईट झाले तर चौदा वर्षे नक्की. ”

“मग काय आम्ही गप्प बसाव काय?”

“मी कुठे तसे म्हणतो? तुम्हाला विलास शेट्टीला धडा शिकवायचा आहे ना? त्याला अद्दल घडवायची आहे ना?”

“होय” दोघे एकसुरात म्हणाले.

“ तो एवढी मग्रुरी कशाच्या जीवावर करतो?” समीरने त्यांना विचारले.

“त्याच्या हॉटेलच्या जीवावर. ते जोरात चालते म्हणून त्याच्या गमज्या. ”

“उद्या तेच जर चालेनासे झाले तर?”

“खरच की, मग गडी ताळ्यावर येईल. पण हे कस करणार?”

“करता येईल. मी सांगतो तसे करा म्हणजे तुमचे नावपण कुठे येणार नाही आणि बदलापण घेता येईल. ”

“सांगा”

मग काय करायचे ते समीरने सविस्तर सांगितले आणि बजावले की हे सर्व काळजीपूर्वक करा. आपल्या तिघांशिवाय या गोष्टीची कुठेही वाच्यता करू नका नाही तर सगळे मुसळ केरात जाईल.

त्या दोघांचेही डोळे चमकले. दोघेही उत्स्फुर्तपणे म्हणाले की त्याची अजिबात काळजी करू नका. आता तुम्ही बघतच रहा आम्ही काय करतो. ते

दोघे गेल्यावर समीरने शाळेच्या लिगल केसेस बघणाऱ्या सरवटे वकीलांना फोन केला आणि जय भवानी हॉटेलची केसची प्रगती कुठपर्यंत आली हे विचारले.

“ अहो कसली प्रगती? अजून तो हजरच झाला नाही. नुसत्या तारखा चालू आहेत. पण तुम्ही काळजी.. ”

त्यांचे वाक्य अर्ध्यातच तोडत समीर म्हणाला, “तो हॉटेल विकण्याच्या खटपटीत आहे. या हॉटेलचा वाद न्यायालयात आहे. कोणी खरेदी विक्री करू नये. अशी स्टे ऑर्डर मिळेल काय?”

“जरूर. या आठवड्यात मिळेल. ”

“ठीक आहे. मिळाली की कळवा. ”

“कळवतो. ”

समीर मोबाईल खाली ठेवत नाही तोवर विजय आलाच. सोबत फाईल्स होत्याच.

“समीर, सगळी काम मार्गी लागलीत. सरांनी बोलावले आहे. ”

दोघेही सरांना रिपोर्ट करायला गेले. सर्व कामाची प्रगती बघून सरांना समाधान वाटले, त्यांनी तसे बोलून पण दाखविले आणि आता ही सर्व कामे वेळेच्या आत पूर्ण झाली पाहिजेत ही तुमची जबाबदारी असे बजावले. नंतर काहीतरी आठवल्यासारखे करून म्हणाले, “ समीर तुझ्यावर अजून एक जबाबदारी मी टाकणार आहे. ”

“कोणती ?”

“स्पोर्टस टिचर करता मी प्रयत्न केले. अजूनतरी कोणी आले नाही. तू हे काम करशील ?”

“जरूर करेन”

“ तुला दिवसातून फारतर एकच पिरेड घ्यावा लागेल याकडे मी लक्ष देईन याशिवाय एखादा ऑफ पिरेड कोणत्याही विषयाचा घ्यावा लागला तर तुझी तयारी आहे काय?”

“ मी प्रशिक्षित शिक्षक नाही पण मी तयार आहे. ”

“ छान. तर मग लागा कामाला. ”

दोघे बाहेर येताच विजय समीरला गमतीने म्हणाला, “मला वाटते तुला जेवायला तरी वेळ मिळेल की नाही. ” समीर वरकरणी हसला पण मनात म्हणाला मला तर रात्रीची झोप पण नको कारण कधीही रिकामा असलो तर माझ्या मनात एकच विचार येतो त्या व्यक्तीचे काय झाले असेल?

................ *..............

# प्रकरण ८

जय भवानी हॉटेल नेहमीप्रमाणे सकाळी आठ वाजता सुरू झाले. अजून गिऱ्हाईकांची वर्दळ सुरु झाली नव्हती. साधारणपणे साडेनऊच्या आसपास कोर्टात येणारे लोक, वकील,आजूबाजूच्या इमारतीवर काम करणारे मजूर येत असत. तोवर विलासने आवाज देऊन सर्वांना कामाला जुंपले. स्वतः गल्ल्यावर बसून सर्व फोटोंना हार घातले. दिवा,उदबती लावली आणि पेपर वाचू लागला. तोवर नऊ वाजले होते. तोच गिऱ्हाईकांचा मोठा लोंढा आलाच. त्यात अशील, वकील, शाळेचे रंगारी सर्व होते. विलास बारकाईने निरखू लागला. परवाचे दोन भांडखोर रंगारी काही दिसत नव्हते. त्याला जरा बरे वाटले. पोऱ्याने पटापट सर्वांसमोर गरम गरम वडापाव ठेवला आणि मोठमोठ्याने बोलत सर्वजण खाऊ लागले. त्यांचा गोंगाट कमी होता की काय म्हणून विलासने रेडिओचा आवाज मोठा केला आणि फार मोठा पराक्रम केल्यासारखे सगळीकडे बघू लागला. असा अर्धा तास गेला असेल नसेल तोच मधल्या टेबलवरून एक किंचाळी ऐकू आली, दोन रंगारी शांतपणे वडापाव खात होते त्यातला एक पोटावर हात दाबून ओरडत विव्हळत होता. दुसऱ्याने त्याला लगबगीने उठवले आणि आधार देत हॉटेलबाहेर नेऊ लागला. ते दोघे गल्ल्यापाशी येताच विलासने हटकले, “ काय पावण, रातची उतरली नाय काय?” दुसऱ्याने रागाने विलासकडे बघितले आणि

फटकारले, “ डोळे हाय का बटण? तो माळकरी हाय. तुझा एक वडा खाल्ला अन बोंबलू लागला. ” नाही म्हणले तरी विलासला हा फटका झोंबला. वरकरणी उसने अवसान आणून तो म्हणाला, “ अरे या गमजा राहू दे. बाकीच्यांना नाय काय झाल?” तो एवढे म्हणतोच तेवढ्यात दुसऱ्या कोपऱ्यातून एक किंचाळी ऐकू आली. यावेळेला ती एका बाईची होती. तिच्याकडे बोट दाखवत तो माणूस म्हणाला, “आता म्हण की तिलापण जास्त झालीया. ” आणि दोघेही बाहेर गेले.

त्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देता विलास त्या बाईकडे गेला. तिने एक वडापाव अर्धवट खाल्ला होता आणि विव्हळत होती. विलास तिच्याबरोबर असलेल्या दुसऱ्या बाईला म्हणाला, “ बरे नाही वाटत ? लगोलग डागदरला दाखीव. जा. आणि दोघी बाहेर गेल्या. एवढी बोलाचाली, धावपळ इतरांच्या नजरेतून सुटणे शक्यच नव्हते. त्यातही वकील मंडळी तर जास्तच चौकस. एक दोघांनी विलासला हटकलेच, ‘काय झाले, वड्यात काही गडबड आहे का?’ वगैरे. तसे काही नाही साहेब. मी स्वतःपण हाच नास्ता केला आहे असे म्हणत सारवासारवी केली पण मनोमनी तो हादरला होता. तसे काही नसेल असे स्वत:ला बजावीत होता. पण एकावेळी दोन गिऱ्हाईकांच्या पोटात दुखणे हा काही योगायोग नाही हे त्याला स्वतःला वाटत होते. त्यानंतर एक तास काहीच घडले नाही. सर्व सुरळीत चालू असताना साडेबाराच्या सुमारास एका अशिलाला असाच त्रास झाला मग मात्र विलास सटपटला. इतका की तो धावतच भटारखान्यात गेला. वड्याचा पुढचा घाणा त्याने बंद केला. जे काही

लोक रेंगाळत होते त्यांना हाकलले. पोऱ्यांना सुट्टी दिली. हॉटेल बंद करून पाटी लावली. 'आकस्मिक कारणामुळे आज हॉटेल बंद राहील.'त्याला त्या दिवसाचा चहा,वड्यांचा घाणा फेकावा लागला.

रेवापुरमधे ही बातमी पसरायला वेळ लागला नाही. दोघांना बाधा झाली ही बातमी पसरता पसरता वीस जणांना बाधा झाली ही अशी झाली.

दुसऱ्या दिवशी किंचित धाकधुकीने त्याने हॉटेल उघडले. स्वतः सर्व तपासले आणि पहिला घाणा काढायला सांगितले. आज तो सर्व गिऱ्हाईकांकडे बारीक लक्ष ठेवून होता. सुदैवाने अकरा वाजेपर्यंत सर्व सुरळीत चालले. काहीश्या सुटकेच्या भावनेने त्याला वाटू लागले की काल अपवादानेच तसे घडले असेल. तेवढ्यात कॉलेजची दोन मुले विव्हळली. कोणालाही सांगावे लागले नाही पण दहा मिनिटात हॉटेल रिकामे झाले.

त्यादिवशी पण विलासला माल फेकावा लागला. ओळीने तीन दिवस असाच प्रकार झाल्यावर गिऱ्हाईक फिरकेनासे झाले. त्यांना तसेही पर्याय भरपूर होते. इकडे विलासची अवस्था दिवसेनदिवस खराब होत होती. गिऱ्हाईक समोर रस्त्यावर दिसत होते पण हॉटेलात येत नव्हते. त्यातच एक दिवस कोर्टाचा माणूस दोन पोलीसांबरोबर आला. काय, कोण, कशाला हे विचारायच्या आत त्याने कोर्टाची हॉटेल खरेदी विक्रीला प्रतिबंध असणारी ऑर्डर दरवाज्यावर लावली आणि निघून गेले.

मग मात्र विलासचा धीर खचला आणि त्याने हॉटेल बंद करण्याचा निर्णय घेतला. एव्हाना शाळेचे रंगकाम पूर्ण झाले होते. किरकोळ कामाकरता संतोष आणि दत्ता येत होते. समीरचा प्लॅन यशस्वी झाला होता.

................ *..............

# प्रकरण ९

अशातच समीरला सरांनी सांगितले की शाळा जूनमधे सुरु होत आहे तरी घराचे बघ. समीर आतापर्यंत कामात इतका आकंठ बुडाला होता की त्याला याकडे लक्ष द्यायला वेळच मिळाला नव्हता अशावेळी त्याला विजयशिवाय कोण मदत करणार होते ?

समीर विजयला म्हणाला, “ आता चार दिवसात घर कसे मिळणार?”

“तू काही काळजी करू नको. मी आहेना. नाहीच कुठे सोय झाली तर माझ्याकडे रहा हो. ”

तेवढ्यात एक साधारण विशीतली शिक्षिका त्यांच्याकडे येतांना दिसली.

”अहो वृंदा मॅडम. ” विजयने आवाज दिला. त्याबरोबर ती त्यांच्याकडे आली.

“काय हो विजयसर, काय म्हणता?”

समीरकडे बोट दाखवत विजय म्हणाला “ हे समीर सर. ”

नमस्कार करत ती म्हणाली, “ मला माहिती आहे. सरांनी मीटिंग मधे ओळख करून दिली आहे. ”

समीरने निरखून बघितले. वृंदा सावळीच होती. शिक्षिकेच्या साध्या वेशभूषेत पण समोरच्याला खिळवून ठेवील इतकी आकर्षक होती. सर्वावर मात करणारे होते ते तिचे डोळे.

“समीर सर, या वृंदा दिवाण. ”

“ इंग्लिशच्या स्कॉलर. ”समीर उत्तरला .

“तुम्हाला कसे माहिती हो?” इती विजय.

“सरांनी ओळख करून देताना सांगितले होते. ”

“ तुमच्या अजून लक्षात आहे?” वृंदाने विचारले.

“ तुम्ही एम ए च्या टर्मस पण करत आहात. पार्ट टाईम,शाळा सांभाळून. ” समीर उत्तरला.

“बरेच लक्षात राहते हो तुमच्या. ” विजय न राहवून बोलला आणि लगेच वृंदाला म्हणाला,” मॅडम, तुम्हाला घर भाड्याने द्यायचं आहे असे मागे एकदा तुम्ही म्हणाला होता. ”

“ घर नाही. एक रूम पण विद्यार्थी नकोत. ”वृंदाने दुरूस्ती केली.

“अहो सरांनाच पाहिजे आहे. ”

वृंदा क्षणभर विचारात पडली पण लगेच म्हणाली, “वरच्या मजल्यावर एक छोटी खोली आहे. समीरला थोडीच चालणार आहे ती?”

“ अहो आधी बघू तर द्या. मग ठरवू चालते की नाही. ”विजय म्हणाला.

“तेही खरे आहे म्हणा. तुम्ही दोन दिवसांनी या तोपर्यंत मी त्या खोलीतले जास्तीचे सामान काढते पण आधीच सांगते खोली लहान आहे, सेल्फ अटॅचड आहे एवढेच. बाकी काही फार अपेक्षा ठेवू नका. ”

“अहो मॅडम समीर सरांना तरी कुठे फार अलिशान सूट पाहिजे आहे? कुठेतरी डोके टेकायला जागा मिळाली तरी खूप आहे हो, काय सर खर आहे ना? दिवसभर ते शाळेतच असणार. ”

“हो, विजयचे म्हणणे बरोबर आहे. माझ्याकडून तुम्हाला काहीही त्रास होणार नाही याची खात्री बाळगा. ”

“तुम्ही परवा या, रूम बघा नंतर आपण बोलू. ” वृंदा म्हणाली.

दोन दिवसांनी विजय बरोबर समीर रुम बघायला गेला. रस्त्यात विजयने थोडी माहिती दिली. वृंदा अजून नोकरीत कायम झाली नाही. घरची परिस्थिती चांगली नाही वगैरे. अर्थात तुम्हाला फोर्स करत नाही पण जरा ॲडजस्ट करा वगैरे. समीरला त्यांची ही आपल्या सहकाऱ्याबद्दलची अनुकंपा स्पर्शून गेली. वृंदा अंगणातच होती. या दोघांना बघितल्यावर या या असे म्हणत ती सामोरी आली आणि म्हणाली, “ आपण पहिले जरा घरी बसू या. चहा झाल्यावर रूम बघा. ” घर लहानसे पण टुमदार होते. खाली चार रूम्स आणि वर एक रूम आणि टेरेस अशी रचना होती.

“प्रथम रूम बघू. मग चहा घेऊ. ”समीर म्हणाला. खोलीला बाहेरूनच जायला जिना होता म्हणजे घरातून येजा करण्याची गरज नव्हती. वृंदाने खोलीचे दार उघडले. रुम बघताच समीरचा भ्रमनिरास झाला. वृंदा म्हणाली ते खरेच

होते. जास्त अपेक्षाच काय माफक अपेक्षा ठेवण्याचीही लायकी नसलेली खोली होती. जेमतेम आठ बाय दहा फुटाची खोली. एकमेव खिडकी,एक कॉट आणि टेबल खुर्ची, पिवळाजर्द सिलींग फॅन. समीरच्या चेहऱ्यावरचे भाव बघून वृंदा म्हणाली,

" मी म्हणाली होते जास्त अपेक्षा ठेवू नका म्हणून. "

"ठीक आहे. सेल्फ अटॅचड आहे शिवाय जिना सेप्रेट आहे. " विजय घाईघाईने म्हणाला, " म्हणजे घरात न जाता येणेजाणे करता येईल. "

" चला आपण खाली चहा घेताना बोलू. "वृंदा म्हणाली. तिघेही खाली आले.

"घरी कोण कोण असते ?" समीरने विचारले.

"मी, माझी आई आणि माझा लहान भाऊ दिपक. " वृंदा म्हणाली आणि तिने दिपकला हाक मारली. एक सतरा वर्षाचा तरुण बाहेर आला. वृंदाने त्यांची ओळख करून दिली.

"कुठल्या वर्षाला आहे?" समीरने विचारले.

" यंदाच बारावी झाला आहे. " वृंदा म्हणाली.

" मग दिपक पुढे कोणती लाईन घ्यायचे ठरविले आहे?"

" ते ताईलाच विचारा. " दिपक त्रासिक मुद्रेने म्हणाला आणि सरळ निघून गेला. त्याच्या अश्या वागण्याने वृंदाला जरा अवघडल्यासारखे झाले.

“सॉरी समीर. जरा ॲडमिशनचे अडले आहे म्हणून तो जरा चिड़चिड़ा झाला आहे. ”

“असू द्या हो, मी पण या स्थितीतून गेलो आहे. ”खोली न्याहाळत समीर म्हणाला. वरच्या खोलीपेक्षा खालच्या घराची काही वेगळी अवस्था नहती. एकंदर घरच आधारहीन वाटत होते. एक जुना सोफा, दोन खुर्च्या, टीव्ही भिंतीवर एक फोटो एवढेच दिसत होते. अजून तिघेही उभेच होते. वृंदाच्या ते लक्षात आले. ती म्हणाली, “ आपण उभे का? बसाना. मी आईला चहा सांगून येते. ”

सोफ्यावर बसतांना समीरची नजर सहज समोरच्या फोटोवर गेली. कुतूहलाने तो फोटोजवळ गेला आणि निरखून बघू लागला. एका तिशीतल्या उमद्या तरुणाचा तो फोटो होता. फोटोखाली नाव लिहीले होते. ‘शशिकांत दिवाकर दिवाण. जन्म १० मे १९८३ मृत्यु १५ एप्रील २०१०.’

मृत्युची तारीख वाचताच समीर पांढराफटक पडला. त्याला गरगरू लागले. विजयच्या लक्षात त्याची अवस्था आली. त्याने विचारले, “ समीर काय झाले?” तेवढ्यात वृंदा बाहेर आली.

“काय झाले?” तिने विचारले.

समीरने कसेबसे विचारले, “ हे कोण?”

“ तो माझा मोठा भाऊ शशी. दोन महिन्यांपूर्वी तो गेला. ”

समीरने परत धाडस करून विचारले, “ काय झाले होते?”

वृंदा रुद्ध कंठाने म्हणाली, “ पुण्यात एका..... ”

तोच तिची आई बाहेर आल्याने ती बोलायचे थांबली. समीरची अवस्था तर आता वृंदाच्याही लक्षात आली. ती काळजीने म्हणाली, “ तुम्हाला बरे वाटत नाही का? तुम्ही आधी बसा आणि चहा घ्या. ” समीर कसाबसा बसला पण त्याच्या मनात आता कसलीही शंका नव्हती. शशीच आपल्या हातून मारला गेला याची त्याला खात्री वाटली. चहा घेताच त्याला थोडे बरे वाटले. तो कोणी काही बोलायच्च्या आत म्हणाला, “मला रूम पसंत आहे. रेंट आणि डिपॉझीट सांगा. ”

क्षणभर वृंदाला आणि विजयला काही कळेना की याला काय सांगावे कारण समीरचे एकंदर राहणीमान बघून त्यांना वाटले होते की हा नाहीच म्हणेल. वृंदाने विजयकडे अपेक्षेने बघितले.

विजय म्हणाला, “समीर इथे पुण्या मुंबई सारखा प्रकार नाही. महिन्याला तीन हजार भाडे ठीक वाटते. भाडे साधारणपणे दहा तारखेपर्यंत दिले तरी चालेल. ”

समीरने काही न बोलता तेहत्तीस हजाराचा चेक लिहीला आणि वृंदाला दिला.

वृंदा चेक वाचत म्हणाली, “हा चेक तर जरा जास्त वाटतो. ”

“अकरा महिन्याचे भाडे दिले आहे. कारण माझी नोकरी तोपर्यंतची आहे. मी उद्यापासून रहायला येऊ शकतो?”

वृंदा समीरला किल्ली देत म्हणाली,“केव्हापण या. ”

बाहेर आल्यावर विजय म्हणाला, “ समीर तू चांगले केले. सध्या त्यांना पैशाची फार गरज आहे. वृंदाच्या पगारात त्यांचे कसेबसे चालते. ”

समीरने विचारले, “तू मला तिच्या मोठ्या भावाबद्दल कधीच काही बोलला नाही. ”

“मला पण तिच्या घरची काहीच माहिती नव्हती. ती मागच्या महिन्यात तर जॉईन झाली. पण ते जाऊ दे. तुला आता बरे वाटते काय? मघाशी फारच अस्वस्थ दिसत होता म्हणून विचारतो हो. ”

आता ठीक आहे असे म्हणून समीर शाळेत परतला आणि डोके गच्च धरून बसला.

................ *..............

# प्रकरण १०

थोडे भानावर आल्यावर त्याने अजयला फोन केला.

“अजय ?”

समीरच्या आवाजावरूनच काहीतरी झाले आहे हे अजयच्या लक्षात आले.

“बोल समीर, काय झाले?”

“ आपण ज्याला शोधत आहो त्या व्यक्तीचा मला शोध लागला, पण तो आता या जगात नाही.” समीर रुद्ध कंठाने म्हणाला.

“ काय म्हणतोस? तू अगोदर जरा शांत हो पाहू आणि मला नीट सविस्तर सांग. ”

समीरने सर्व सांगितले.

“त्या कुटुंबाच्या आजच्या परिस्थितीला मीच जबाबदार आहे. मी उद्याच वृंदाला सर्व सांगतो मग पुढे काय होईल ते होईल. ”

आपला हा भावनाशील मित्र नक्कीच असे काही करील याची खात्री असल्याने अजय जरा भांबावला. थोडा वेळ शांत राहून त्याने समीरला विचारले, “ तुझी खात्री आहे ?”

“ हो. ती सर्व सांगणार होती तेव्हढ्यात तिची आई आल्याने ती थांबली. ”

“ तरी पण नंतर एकदा पूर्ण विचार. ”

“ माझी हिम्मत नाही. अजून त्यांची जखम ओली आहे. मघाशीच विचारले तर तिला रडायला आले होते. मीच याला जबाबदार आहे. ”

अजयने समीरची कशीबशी समजूत काढली. “ ठीक आहे. हे बघ जे झाले ते अकस्मात झाले. आता तू जरा धीराने वाग. त्या कुटुंबाला मदत कर आणि नंतर वृंदाला खरे काय ते सांग. वृंदा मानी वाटते. तू आताच तिला सर्व सांगितले तर ती तुझी मदत स्वीकारणार नाही आणि परिस्थिती अजून चिघळेल. तुला अंशत: तरी काही केल्याचेपण समाधान मिळणार नाही. थोडा विचार कर. आताच सर्व सांगण्याची गरज नाही किंवा ही वेळ नाही असे मला वाटते. तुझे जेवण झाले का?”

“नाही. ”

“ मग आधी जेवून घे. शांतपणे झोप. मी सकाळी परत फोन करेन. ”

“ठीक आहे. ” समीरने मोबाईल बंद केला. त्या रात्री समीरला अजिबात झोप लागली नाही. सारखा शशीचा चेहरा डोळ्यासमोर येत होता. वृंदाच्या फॅमिलीचा विचार डोक्यात फिरत होता. काय करावे हे सुचत नव्हते. एकदा वाटायचे की सर्व सांगून टाकावे म्हणजे ही सततची बोच तरी कमी होईल दुसरीकडे अजयचे म्हणणेही पटत होते. त्यामुळे बोच थोडीतरी कमी झाली असती. शेवटी अजयच्या म्हणण्याप्रमाणे वागायचे त्याने ठरविले आणि त्याला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो त्याची बॅग घेऊन रूमवर गेला. किल्ली जवळ असल्याने कुलूप काढून सरळ आत गेला. आता खोलीचे स्वरूप अजून जरा नीटनेटके केल्यासारखे त्याला दिसले. तेवढ्यात अजयचा फोन आला.

त्याने अधीरपणे विचारले. “ हॅलो समीर सुप्रभात, काय ठरवले ?”

“तू म्हणतो ते बरोबर आहे. सुरवातीला अप्रत्यक्ष मदत करतो आणि नंतर धीर करून सर्व सांगेन. पण तुझी मदत लागेल. ”

“अरे यात काय विचारायचे. केव्हाही फोन कर. बंदा हाजीर है. ”

तेवढ्यात दारावर टकटक झाली.

“ मी फोन ठेवतो. कोणीतरी आले वाटते. ”

“ ठीक आहे. काळजी घे. ”

समीरने दार उघडले तर समोर दिपक उभा होता. हातात चहाचा ट्रे होता.

“ ताई म्हणाली बहुतेक तुम्ही आला असाल म्हणून चहा पाठवला आहे.”

“ये ना, आत ये. ” दिपक अनिच्छेच आत आला. ट्रे टेबलवर ठेवत म्हणाला,

“तुम्ही एकटेच आलात? सामान दिसत नाही?”

“ मी एकटाच आहे. ” समीर म्हणाला आणि बॅगकडे बोट दाखवत म्हणाला, “सामान हे एवढेच. ”

दिपकचे त्याकडे काही लक्ष नसावे कारण तो खोली बघत म्हणाला, “ ही माझी अभ्यासाची खाली होती. ”

“होती नाही आहे. ” चहा घेत समीर म्हणाला, “ अजूनही केव्हाही ही वापरु शकतोस. तसाही मी बराच वेळ शाळेतच असणार. ”

दिपक जरा रिलॅक्स झाला, “ताई म्हणत होती तुम्ही फार स्ट्रिक्ट आहात. ”

“जिथे व्हायला पाहिजे तिथे आहे. बाकी भित्रा माणूस आहे. ” समीर मनापासून म्हणाला.

दिपकला हसू आले. अजून काही विचारायचे समीरच्या मनात होते पण पहिल्याच भेटीत नको असे त्याला वाटले.

“चहा बद्दल आभार पण ही वहिवाट नसावी. ” समीर नाटकीपणे म्हणाला.

दिपक खळखळून हसला आणि ट्रे घेऊन परतला. समीरने त्याचे आवरले आणि शाळेत गेला.

भगवंताने त्याचे रंगकाम १० तारखेलाच संपवले. आता दारे, खिडक्या स्वच्छ करणे, रंगवणे याकरिता संतोष आणि दत्ता यांना मागे ठेवले. नेम प्लेट्स नंबर पण तेच लावणार होते. एकंदर त्या फ्रंटवर लक्ष देण्याची एवढी गरज नव्हती. शाळा एकंदर रंगरुपाला आल्यासारखी वाटत होती.

ठरल्याप्रमाणे १५ तारखेला निकाल लागला. शाळेचे बदललेले रंगरूप बघून पालकांना बरे वाटत असल्याचे दिसत होते.

“या गोष्टी महत्त्वाच्या आहेत पण याहीपेक्षा महत्वाचे आहेत ते विद्यार्थी. त्यांची प्रगती. त्यावर आपण लक्ष केंद्रित करायला पाहिजे. ” सरांनी मिटिंगमधे बजावले. दुसऱ्या दिवशी अपेक्षेप्रमाणे वृंदा लंचटाईमला ऑफिसमधे आली.

“ दिपक तुझ्याशी काही नीट बोलला नाही याबद्दल मी क्षमा मागते. ”

"नको मागू. काल सकाळी तो मला भेटला, आता आम्ही दोस्त आहोत. ”

ती आश्चर्याने म्हणाली, “ कधी?”

“ चहा द्यायला आला होता तेव्हा. ”

ती समाधानाने म्हणाली. “चला हे छान झाले पण मुळात तो तसा नाही. ”

“मी समजू शकतो. आता एवीतेवी विषय निघालाच आहे तर मी काय प्रॉब्लेम आहे हे विचारू शकतो काय?”

“ प्रॉब्लेम काय असणार ? जो मध्यमवर्गीयांचा असतो तोच. पैशाचा. त्याला इंजिनियरिंगला प्रवेश घ्यायचा आहे. पर्सेन्टेज कटऑफपेक्षा थोडे खाली आहे. ”

“समजलो. किती डोनेशन मागत आहेत?”

“दोन लाख. हे पैशाचे सोंग मी कसे आणू?”

“तुझी हरकत नसेल तर मला त्याची मार्कलिस्ट, ज्या कॉलेजमधे ॲडमिशन पाहिजे आहे त्याचे डिटेल्स मला देशील काय?”

किंचित अविश्वासाने त्याच्याकडे बघत ती म्हणाली,

“ तू काय करणार? मला कोणत्याही वाकड्या मार्गाने ॲडमिशन नको आणि तुझ्या पैशाने तर अजिबात नको. ”

समीरला अजयचे शब्द आठवले. ‘वृंदा मानी आहे.’तो गडबडीने म्हणाला, “ तसे काही नाही. माझे वडील बऱ्याच शिक्षणसंस्थांचे ट्रस्टी आहेत. जर त्यांच्या ओळखीने सहज काम झाले तर बघू नाहीतर राहीले. मग तर झाले?”

“मग ठीक आहे. पण तू पदरचे घालू नको. ”

“ छे. छे . मी तसे काही करणार नाही. ” समीर वरकरणी म्हणाला. मनात मात्र’आधी डिटेल्स तर दे माझे बाई’असे म्हणाला.

त्यावर तिने संध्याकाळी दिपक तुला डिटेल्स देईल असे सांगितले आणि ती गेली. संध्याकाळी दिपक फाईल घेऊन भेटला. समीरने त्याच्यासमोर फाईल चाळली. खरेच कट ऑफखाली फक्त एक पर्सेंट मार्क होते. या एक पर्सेंटमधे सहज हजार विद्यार्थी येतात हे समीरला अनुभवाने माहिती होते. त्याने सर्व पेपर्सचे स्नॅप घेतले आणि त्याच्या वडिलांना पाठवून दिले. माझ्या एक कलीगच्या भावाला ॲडमिशन पाहिजे आहे अशी नोट पाठविली आणि दिपकसमोरच बाबांना फोन लावला.

“बाबा. मी तुम्हाला काही स्नॅप पाठविले आहेत. ”

“ हो मिळाले. काय रे काही विशेष?”

“ माझे शाळेतले कलीग आहेत. फार गरजू आहेत. ”

“ठीक आहे. तीन दिवसात कळवतो. पण काय रे तू आतापर्यंत कधी अशी काम सांगितली नाहीस. आत्ताच काय विशेष?” बाबांना पण आताच फिरकी घ्यायची लहर आली.

‘तुम्हीपण बाबा’म्हणत समीरने मोबाईल बंद केला. दिपक कान टवकारून ऐकत होता. समीरने काही सांगायच्या आत तो म्हणाला की ताईला सांगतो की

काम झाले. त्याला थांबवत समीर म्हणाला, “ जरा धीर धर. तीन दिवसांनी लेटर दाखव आणि कुठे बोलू नकोस. ”

“ का पण? ताई काळजी करेल. ”

“अरे आपले सिक्रेट आहे ते. करू दे तिला काळजी. ”

ओके म्हणत तो पळाला. मध्यमवर्गीयाच्या घरातला कर्ता पुरुष जर गेला आणि राहिलेल्यात कोणी कमावता नसला तर कसे हाल होतात हे बघून समीरला वाईट वाटले. या परिस्थितीला एकप्रकारे आपणच जबाबदार आहोत हे त्याला जाणवत होते. अजयचा सल्ला ऐकल्याने आपण काहीतरी करू शकलो याचे पण त्याला समाधान वाटले. त्याने तसे अजयला सांगितले पण.

तू आता असले विचार डोक्यात आणू नकोस. फक्त त्यांच्या समोर जे मोठे प्रश्न असतील तेवढे सोडव असे अजयचे मत पडले. या गोष्टीने त्याची रुखरुख थोडी कमी झाली.

बाबांनी म्हटल्याप्रमाणे तीन दिवसांनी कॉलेजचे प्रत्र आले आणि समीरचा जीव भांड्यात पडला. दिपकचे कॉलेज सुरळीत सुरु झाले. वृंदाच्या चेहऱ्यावरील ताण जरा कमी झाल्यासारखे वाटले. तिने दोनतीनदा हे कसे झाले, तू काय केले वगैरे विचारले पण समीरने दाद लागू दिली नाही.

................ *..............

# प्रकरण ११

मुख्य कामे आटोपल्याने तो आता वाट बघू लागला पावसाची कारण टिचर्स रुमच्या भिंतीची परीक्षा पाऊसच घेणार होता. १२ जूनला शाळा सुरु झाली आणि आणि १७ जूनला मेघराजा बरसला. बरसला म्हणजे सणसणीत बरसला. आता आपली खरी भिंतपरीक्षा असा विचार समीरच्या मनात आला. दोनतीन दिवसांनी त्याने विजयला बरोबर घेऊन आतून बाहेरून भिंत तपासली. कोठेही ओल नव्हती. त्याची भिंत तपासणी सुरू असतांना अर्थातच पाटील सरांचे लक्ष होतेच. 'अजून पावसाळा बाकी आहे'त्यांनी टोमणा मारलाच. समीरने मागे न बघताच म्हणाला, " सर, मी जे बोलतो ते करतो आणि जे बोलत नाही ते हमखास करतो. " आणि मागे न बघताच बाहेर पडला. बाहेर पडताच विजयने विचारले, "त्या वाक्याचा काय अर्थ होतो हो ?"

समीर हसून म्हणाला , "कोणास ठाऊक, कुठे तरी ऐकले दिले ठोकून. आता बसू दे पाटीलसरांना विचार करीत. "

आपल्यावर स्पोर्टची जबाबदारी टाकलीच आहे तर खेळाची सामुग्री तरी काय आहे हे बघावे म्हणून समीर स्टोअर्सला गेला. तेथील इन्चार्जने सर्व मटेरीयल दाखविले. त्याला आश्चर्य वाटले कारण फुटबॉल,क्रिकेटचे सामान अगदी नवीन वाटत होते. तीच गत डम्बेलस, लेझीम यांची होती. हवेचा पंप पण नवीन होता.

"हे सर्व यंदाच खरेदी केले काय ?"

“ नाही. दोन वर्षे झालीत. बघा. ” रजिस्टर पुढे करत तो म्हणाला. रजिस्टर बाजूला करत समीर म्हणाला, “ मग अजून वापरले का नाही?”

“ वापरून खराब होईल असे राठोड सर म्हणाले”

“ राठोड सर म्हणजे भूगोलाचे?”

“होय. ते स्पोर्टस् बघायचे. ”

बघायचे म्हणजे खरच बघायचे पण दुरून. समीर मनात म्हणाला. या सामानाला मैदान दाखवायचे त्याने ठरवले. तशी संधी त्याला लवकरच मिळाली. सातवीच्या वर्गाचा पी. टी. पिरेड होता. पावसाची रिमझीम सुरू होती. समीर वर्गात आला तेव्हा सर्व मुले हिरमुसली होऊन बसली होती. हा शेवटचा पिरेड होता. आतापर्यंच्या अनुभवावरून पाऊस असला आणि पी टी पिरेड असला तर वर्गात होमवर्क करावे लागत असे. समीर वर्गात येताच त्यांनी वह्या पुस्तके काढली. “अरे,वह्या पुस्तके का काढता? इतका छान पाऊस पडतो आहे. तुम्हाला वाटत नाही का पावसात फुटबॉल खेळावा?” हातातील फुटबॉल वर्गात फेकत समीर म्हणाला.

दुसऱ्या क्षणाला वर्ग रिकामा झाला आणि मैदानावर आरडाओरडा सुरू झाला. एकच विद्यार्थी ज्याच्या पायाला प्लॅस्टर होते तो जाऊ शकला नाही. तो वर्गात बसून राहिला. समीरने हळूवारपणे त्याला उचलले. शिपायाला खूण केली आणि अलगद व्हरांड्यात खुर्चीत नेऊन बसवले.

“आरामात खेळ बघ. प्लॅस्टर निघाले की तू पण खेळ.” असे म्हणून समीरपण मैदानात पळत गेला आणि खेळू लागला. पावसाची रिमझीम चालूच

होती. पंधरा मिनिटे खेळ जोरात चालू होता. शाळेच्या इतिहासात हे अघटीत असावे कारण मुलांचा गलका ऐकून बरेच शिक्षक वर्गाबाहेर येऊन काय चालले आहे हे बघू लागले. मध्येच गलका थोडा कमी झाल्याचे त्याला जाणवले. त्याने वळून व्हरांड्याकडे बघितले तर पाटील सर हातवारे करत पाठक सरांना घेऊन मैदानाकडे येतांना दिसले. त्यांनी सरांच्या डोक्यावर छत्री धरली होती.

“सर,आता?” एका मुलाने विचारले

“ आता काय ? पीटीचा तास आहे. खेळ सुरु ठेवा. ”

‘हो’असा गलका सुरू करत मुले परत खेळू लागली. पाटील सर आणि पाठक सर सीमारेषेवर येताच पाठक सरांनी दोन मिनिटे रंगात आलेला खेळ बघितला. तिसऱ्या मिनिटाला त्यांनी पाटील सरांची छत्री हातानेच दूर सारली आणि ते पण खेळात सामील झाले. सर्व जण शाळा सुटेपर्यंत मनसोक्त खेळले. एक एक करत समीरने सर्व खेळाचे सामान बाहेर काढत पीटीचा तास म्हणजे फक्त कवायत नाही तर ज्याला जे पाहिजे ते त्याने खेळावे इथपर्यंत मुलांची तयारी त्याने दोन महिन्यात केली. अर्थात पाठक सरांच्या पाठिंब्याशिवाय या गोष्टी होऊ शकल्या नसत्या. क्लास टेस्ट आणि तिमाही परीक्षेत कळतील याचे परिणाम या पाटील सरांच्या टोमण्याला उत्तर द्यायच्या फंदात समीर पडला नाही.

................ *..............

# प्रकरण १२

इकडे वृंदाने घरावर असलेल्या कर्जाचा ओझरता उल्लेख केला होता पण किती,कोणाचे याविषयी ती काहीच बोलली नव्हती. ते त्याला अचानक कळले. ती स्वतःहून सांगणे तर शक्यच नव्हते. एक दिवस तो शाळेतून जरा लवकर आला होता. त्याला घरातून दोन तीन लोकांचा बोलण्याचा आवाज आला. दार उघडेच होते म्हणून तो आत डोकावला. त्याला बघताच वृंदाची आई म्हणाली, “समीर वेळेवर आलास बाबा. जरा बघ. ही माणसे काय म्हणत आहे ते मला काही कळत नाही. ”समीरने त्या माणसाकडे बघितले.

“ साहेब, आम्ही फक्त बँकेची नोटीस द्यायला आलो आहोत आणि नोटीस मिळाली अशी आम्हाला सही पाहिजे. ”

“ कसली नोटीस?”

“ ते काही माहित नाही. ”

“माझी सही चालेल काय?”

“चालेल. फक्त त्यांना द्या आणि त्यात काय आहे हे नीट समजावून सांगा. ” समीरने सही करून नोटीस घेतली. काकूच्या हाती पाकीट देत म्हणाला,

“वृंदा आली की तिला द्या. ” त्यांनी पाकीट घेतले आणि समीरला म्हणाल्या,

"समीर,ही कसली नोटीस आहे जरा बघतोस ?"

"काकू, मी बघितली तर वृंदाला आवडणार नाही. "

"मी सांगेन तिला. "

बँकने सहा लाख रुपयाच्या कर्जाची परतफेड न झाल्याने तीन महिन्यात जप्ती आणू असे कळवले होते. त्याने तसे वाचून दाखविले. काकूंना काय बोलावे ते कळेना. त्यांचा चेहरा रडवेला झाला.

समीरने विचारले, "हे कर्ज केव्हा, कसे घेतले याची तुम्हाला कल्पना आहे काय?"

"वृंदाच्या वडिलांनी घेतले होते घराकरता, थोडेफार फेडलेही होते. नंतर अचानक ते गेले. "

"ते काय करत होते?"

" बाजार समितीत कारकून होते. विम्याची पण कामे करायचे. "

" मग त्यांची काही गुंतवणूक,पॉलिसी वगैरे असेल ना?"

" काही बोलले नाहीत कधी पण नसावी. "

हे काही समीरला पटले नाही. विमा एजंट स्वतःची गुंतवणूक सहसा व्यवस्थित करतात. त्याशिवाय ते लोकांना विम्याकरता कसे प्रवृत्त करणार हे त्याचे साधे तर्कशास्त्र होते. शिवाय जुने लोक आपल्या व्यवहाराबद्दल घरी फारशी माहिती देत नसत याची त्याला कल्पना होती.

“हे बघा,माझा काही तसा अधिकार नाही. तरीही विचारतो. त्यांचे सर्व कागदपत्र तुम्ही बघितले काय?”

“ बघितले. मला त्यातले काही कळत नाही. आजपण ती फाईल वेगळी ठेवली आहे. ”

“तुम्ही वृंदाशी एकदा बोला. तिची हरकत नसली तर मी एकदा ती फाईल बघितली तर चालेल काय हे विचारा. ”

“ बोलते. ”

त्या बोलल्या असाव्यात कारण संध्याकाळी दिपकमार्फत फाईल मिळाली. समीरने दोनतीन दिवस एक एक पेपर काळजीपूर्वक बघितला कारण फाईल बरीच जुनी होती. कागद जीर्ण झाले होते. कागदपत्रे, पावत्या, पॉलीसीज व्यवस्थित क्रमवार लावली होती. पण एक शक्यता त्याला सेक्युरिटीज आणि शेअर्स सर्टिफिकेटमधे वाटली. त्यांच्या वेळेस डिमॅट नव्हते. शेअर्स खरेदी विक्री पेपरवर व्हायची. ते डिमॅटला ट्रान्स्फर केलेले नव्हते. कंपन्यापण काही मर्ज झाल्या असतील, नावे बदलली असतील तर नोंदी नव्हत्या किंवा आता ट्रॅन्स्फर करून घ्यायला पाहिजे होत्या. त्यांच्या आकस्मिक मृत्यूने हे सर्वच राहिलेले दिसत होते. हे सर्व अपडेट केले आणि विकले तर सहज चार लाख तर उभे राहीले असते असे त्याला वाटले. अर्थात ब्रोकरकडून नक्की आकडा कळू शकेल. हे त्यानी वृंदाला आणि तिच्या आईला नीट समजावून सांगितले.

“आता तूच पुढाकार घेऊन हे मार्गी लावून दे. ” वृंदा म्हणाली.

“मी तुला मदत करेन पण तुला यातल्या बऱ्याच गोष्टी कराव्या लागतील म्हणजे ब्रोकर सांगेल काय करायचे ते. हे सर्व अपडेट व्हायला तीन महिने तरी लागतील. ”

“ मला यातले खरच काही कळत नाही. तुझ्या ओळखीनेच बघ. ” वृंदा काकुळतीला येऊन म्हणाली. तिच्या दिनवाण्या मुद्रेकडे बघून समीरला अधिकच अपराध्यासारखे वाटू लागले. क्षणभर त्याला असेही वाटले की सरळ एक चेक देऊन हे इथेच संपवावे. पण अजयचा सल्ला आठवून तो गप्प बसला. शिवाय तसे करणे म्हणजे तिला दुबळे करणे हे पण त्याला पटत होते.

“ तू काही काळजी करू नकोस. मी तुला लागेन ती मदत करेन. ”

समीरने त्याच्या ओळखीच्या माणीक मुणोत या मित्राशी संपर्क साधला. सर्व सांगितल्यावर शक्यतो रेवापुरमधील कोणी माहिती आहे का हे विचारले. त्याने लगेच मेहता अँड मेहता फर्मचे नाव सांगितले. माझा मावसभाऊच आहे मी त्याला फोन करून सांगून ठेवतो. तो बरोबर गाईड करेल अशी ग्वाही दिली. त्याप्रमाणे समीर आणि वृंदा, भाईजी मेहताला भेटले. भाईजी अतिशय बिझी माणूस असल्याची कल्पना असल्याने समीरने सरळ फाईल त्याच्याकडे दिली आणि काय करावे लागेल हे विचारले. त्याने मला माणीकचा फोन आला होता. दोन दिवस हे चेक करायला द्या. त्यानंतर मी कसे करायचे आणि किती दिवस लागतील हे सांगतो म्हणत पहिली मुलाखत संपवली. दोन दिवसांनी भेटल्यावर त्याने काय काय गोष्टी लागतील, कोणते फॉर्म भरावे लागतील याची यादी

दिली. वृंदाने यादी वाचली आणि समीरला दिली आणि विचारले अंदाजे किती दिवस लागतील तसेच रक्कम किती मिळेल?.

“ अंदाजे दोन महिने लागतील. रक्कम आजच्या मार्केट रेट प्रमाणे चार लाख सहज होते. ”भाईजी शांतपणे म्हणाला. वृंदाचा स्वतःच्या कानावर विश्वास बसेना.

“खरच?”

“ खरच सांगतो भाभीजी. मोटामोटी चार लाख म्हणतो. पन्नास साठ हजार इकडेतिकडे . ”

“तुमचा गैरसमज होत आहे. माझे अजून लग्न झाले नाही. ” वृंदा लाजून म्हणाली.

“होय का? मग दोन महिन्यानंतर होईल. लग्नाला बोलवा. जय गोपालजी.”

भाईजी मिश्किलपणे म्हणाला आणि दुसऱ्या कामाकडे वळला. बाहेर पडल्यावर जिना उतरतांना समीर वृंदाला म्हणाला, “ तू पाहिजे असल्यास दुसऱ्या कोणाकडून क्रॉस चेक कर. ”

“ काहीतरीच काय? माझा तुझ्यावर पूर्ण विश्र्वास आहे. ” असे मागे वळून वृंदा म्हणत असता तिचा पाय पायरीवरून निसटला. समीरने तिला सावरले. त्याचा हात घट्ट धरून ती पुढे म्हणाली, “ फक्त मधूनच हात सोडू नको. ”

त्याने निग्रहाने मन दुसरीकडे वळवले. त्याला वाटले हिला जेंव्हा खरे कळेल तेंव्हा कदाचित हिच आपला हात सोडेल.

“समीर उरलेली रक्कम कशी कभी करायची? माझी नोकरी पण तात्पुरती आहे. ”

“एका इंग्लिशच्या स्कॉलरने असे म्हणावे याचे मला नवल वाटते. ” समीर नाटकीपणे म्हणाला, “ तुझ्या टेरेसवर एक शेड उभारून तू जर इंग्लिशचे क्लासेस सुरू केले तर नोकरीच्या दुप्पट महिन्याला कमावशील आणि माझ्यासारखे दोन मॅनेजर हाताखाली ठेवशील. ”

“ समीर,” कृतककोपाने हात उगारत वृंदा म्हणाली पण मनातून तिला त्याचे म्हणणे पटले होते.

दोनच आठवड्यात टेरेसवर ‘सरस्वती क्लासेस’सुरू झाले. वृंदाचा आत्मविश्वास जागृत झालेला बघून समीर सुखावला. तरीपण त्याने भाईजीला वृंदाच्या नकळत एक फोन करून सांगितले की फायनल रक्कम सहा लाख मिळेल असे सांगा. जो फरक आहे तो माझ्याकडुन घ्या.

एकदाचे सर्वकाही वृंदाला सांगून टाकावे मग तिची काय प्रतिक्रिया होईल ती होईल अशी उर्मी त्याला बरेचदा यायची पण अजयने दिलेला सबुरीचा सल्ला आठवून तो गप्प बसायचा.

................ *..............

# प्रकरण १३

आता पावसाचा जोर कमी झाला होता. तिमाही परीक्षा झाल्या होत्या. जरी खेळाचे प्रमाण वाढले होते तरी मुलांच्या अभ्यासावर काही पाटील सर म्हणत होते तसा परिणाम झालेला दिसला नाही. तसेच टीचर्स रुमच्या भिंतीवर ओल आली नव्हती. आंतरशालेय खेळाच्या स्पर्धा सुरु व्हायच्या होत्या. सरांनी मीटिंग मधे सर्व शिक्षकांना आवाहन केले की त्यांनी खेळाकरता मुलांना प्रोत्साहित करावे.

“सर आतापर्यंत आपण कधी सर्व स्पर्धात उतरलेलो नाही. ” पाटील सर म्हणाले.

“का? काही विशेष कारण?”

“मुलांच्या अभ्यासावर परिणाम होतो. ”

“पाटील सर गेल्या तीन महिन्यात मला तरी तसे काही आढळले नाही. ”

“तसेही आपल्याला काही पदके मिळत नाही. ”

“ पदकांसाठी नाही पण खेळाच्या आनंदासाठी तरी भाग घ्यायला हवा. समीर तुला काय वाटते?” सरांनी विचारले.

“प्रत्येक खेळात काही आपण फायनलपर्यंत पोचू असे नाही. निदान खेळण्याच्या आनंद तरी मुलांना मिळू द्या. ”

शालेय क्रीडास्पर्धांच्या तारखा जाहीर झाल्या. तसे पत्रक शाळेत आले. सरांनी समीरला जास्तीत जास्त खेळात भाग घेण्यास सांगितले. पदके किती मिळतील याचा विचार करू नको, भाग घेणे महत्वाचे आहे. ते म्हणून थांबले नाहीत तर विजय आणि अजून दोन शिक्षकांना समीरला मदत करण्यास सांगितले. त्याप्रमाणे शाळेत ज्यांना भाग घेण्याची इच्छा आहे त्यांनी आपली नावे या चौघांकडे द्यावी अशी नोटीस शाळेने लावली.

रोजच्या पी टी पिरेडमुळे मैदानी खेळात कोण भाग घेऊ शकतील, क्रिकेट, फुटबॉलमधे कोण नावे देतील याचा समीरला अंदाज होता. त्याने टीम तयार करायला आधीच सुरवात केली होती. याची चर्चा टिचर्स रुममधे होणे स्वाभाविक होते. शिक्षकांचा सूर तसा नाराजीचा होता. एक महिना मुलांना खेळासाठी सूट, द्यावी लागणार, अभ्यासाकडे दुर्लक्ष होणार असे त्यांना वाटत होते, आतापर्यंत शाळेची कामगिरी तशी नगण्यच होती. यातून काय साध्य होणार ही शंका होतीच पण सरांनीच सांगितले म्हणून नाराजीनेच का होईना पण सर्वजण मदत करू लागले.

समीर, विजय आणि त्यांच्यासारख्या नवीन काही जणांना मात्र तसे वाटत नव्हते. बोलण्यापेक्षा आणि वाद घालण्यापेक्षा आपण कामातून बोलू हे समीरचे मत त्यांना मान्य होते. समीरने तर दोन क्रिकेटच्या टीम तयार केल्या आणि इतर शाळांशी प्रॅक्टिस मॅचेस घ्यायला सुरवात केली.

या सर्व तयारीचा आणि संयोजनाचा परिपाक म्हणजे शाळेने क्रिकेटमधे फायनल मारली तसे धावण्याच्या प्रत्येक प्रकारात पहिला किंवा दुसरा क्रमांक

पटकावला, दोनशे आणि चारशे मिटर स्पर्धेत तर त्यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत पण क्रमांक पटकावला. याची दखल घेवून विशेष प्रशिक्षणासाठी त्यांना पतियाळा येथे पाठविण्याचे राज्य शासनाने ठरवले.

या यशाने शाळेने अर्थातच भरभरून कौतुक केले. आधी टिका करण्यात जे पुढे होते ते आता कौतुक करायला पुढे सरसावले. उलट आम्ही आधीच सांगत होतो,शाळेत गुणी खेळाडूंची कमतरता नाही अशा चर्चा सुरु झाल्या. असे काही फार मोठे घवघवीत यश नव्हते पण समीर त्यामुळे जरा सुखावला हे मात्र खरे. काही दिवसातच हा कौतुकाचा भडिमार ओसरला आणि समीर आपल्या साचलेल्या कामाचा उपसा करू लागला. अशातच सरांचा फोन आला.

“ समीर जरा ऑफिसमधे येतोस का?”

समीर ऑफिस मधे गेला तिथे दोन विद्यार्थ्यांचे पालक आले होते.

“ हे श्री व सौ साळुंके आणि भोसले. आपल्या दोनशे आणि चारशे मिटरमधील विजेत्यांचे पालक आणि हा समीर. ”

“ अभिनंदन. ” समीर म्हणाला कारण त्याला वाटले हे आभार मानायला आले असातील पण तसे नव्हते.

“तुमचे अभिनंदन राहू द्या तुमच्याजवळच. आधी सांगा हे धावण्याचे खुळ तुम्ही मुलांच्या डोक्यात का भरवले ?” सौ साळुंके तणतणल्या

“ हे बघा आता ते दोघेही पतियाळाला जायचे म्हणून अडून बसलेत. ” भोसलेंनी री ओढली. समीर बुचकळ्यात पडला.

“अहो,दोन हजार स्पर्धकामधून तुमच्या मुलांची निवड झाली याचा तुम्हाला काहीच आनंद नाही?”

“आहे ना पण ते इतके पुढे जातील हे आम्हाला वाटले नव्हते, आता तुम्हीच त्यांना समजवा की हे खुळ आपल्याकरता नाही म्हणून. ” परत सौ साळुंके बरसल्या.

" हे बघा सर, मी एक मध्यमवर्गीय माणूस आहे. मुलाने इंजिनिअर व्हावे एवढीच अपेक्षा आहे आणि आता त्याच्या डोक्यात हे घुसले आहे. ” आता श्री भोसलेना कंठ फुटला.

“अहो, एवढे जपून जपून का बोलता? सरळ सांगा की मुलाला तुमच्यासारखा पंधरा वीस हजार कमावणारा मास्तर करायचा नाही म्हणून. ” सौ भोसले करवादल्या. आता मात्र समीरला हसायला आले. त्याने आवाज चढवून विचारले, “तुम्हाला कोणी सांगितले की ही मुले मास्तर होतील? आणि मास्तर असणे म्हणजे काही कमीपणा आहे काय? तुम्हालापण कोणी मास्तरांनीच शिकवले आहे ना?”

समीरच्या या भडिमारापुढे काय बोलावे हे त्यांना सुचले नाही. तरी साळुंके रेटून म्हणालेच, “ विषय तो नाही.... ”

“ विषय तोच आहे. ” समीर त्यांना अडवत म्हणाला, “ तुमच्या मनात हीच भीती आहे की मुलांनी खेळात नाव कमावले ते डॉक्टर, इंजिनियर होणार नाहीत. तुमच्या माहिती करता माझी ओळख सांगतो. मागील वर्षी इंजिनियरिंगला फर्स्ट आलेला समीर देशपांडे मीच. फायनलला असतांना क्रिकेट, फुटबॉल, रनींग मी विद्यापीठ स्तरावर खेळलो आहे. स्वानुभवाने सांगतो, खेळाचा अभ्यासावर चांगलाच परिणाम होतो. ”

यावर ते चौघेही गप्प झाले.

धीर धरून सौ साळुंकेनी विचारले, “ तरी तुम्ही इथे नोकरी.. ?”

“ काही आकस्मिक कारणांमुळे समीरला एक वर्ष इथे थांबावे लागले, रिकामे बसण्यापेक्षा काहीतरी करावे या उद्देशाने तो ही नोकरी करत आहे. ” इतका वेळ मजेने वाद ऐकण्याऱ्या सरांनी हस्तक्षेप केला. तेवढ्यात चहा आला. आता त्यांचा समीरकडे बघण्याचा दृष्टिकोन पूर्ण बदलला होता.

“मग, समीर सर, आता काय करावे असे तुम्हाला वाटते?” श्री साळुंके म्हणाले.

“ अशी संधी खरी गुणवत्ता असेल तरच मिळते. म्हणून मला तरी वाटते ही संधी तुम्ही सोडू नये. शेवटी तुमचा निर्णय तुम्हालाच घ्यायचा आहे. ”

“ पण शिक्षणही महत्वाचे आहे ना ?”

“आहे. ते कोण सोडायला सांगतो आहे. त्यांचे ट्रेनिंग शाळेच्या वेळापत्रकाशी संलग्न असते. शाळा त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करून घेईल. ” सरांनी ग्वाही दिल्यावर सगळेचे शांत झाले.

“त्यानंतर ही मुले जेंव्हा राष्ट्रीय स्तरावर चमकतील तेंव्हा टीव्ही चॅनेलवर मुलाखती देताना शाळेचा उल्लेख करायला विसरू नका. ” या समीरच्या अंतिम शेऱ्याने वातावरण सैल झाले.

................ *..............

# प्रकरण १४

दसरा, दिवाळी पाठोपाठ वार्षिक स्नेहसंमेलन धड़ाका उडाला. त्यामुळे नवीन वर्ष केव्हा सुरु झाले हे कळलेच नाही. आता मात्र अभ्यासक्रम पुरा करणे या एकाच गोष्टीवर सर्व लक्ष केंद्रित झाले. समीर पण देखभाल, दुरुस्ती, कॉन्ट्रॅक्ट नूतनीकरण या कामात बुडाला.

तो दर शनिवार रविवारी पुण्याला जात असे. अशातच एका रविवारी त्याच्या बाबांनी त्याच्या कामाबाबत चौकशी करतांना सुचविले की आता कारखान्याकडे लक्ष दे. अजून एक शाखा चालू करावी लागणार आहे आणि त्याकरता तुझी आवश्यकता आहे. समीर चपापला. ही 'आता बास झाले या परत' अशी सुचना आहे एवढे त्याला कळले.

" बाबा, एवढे तीन महिने जाऊ द्या. मधेच सोडून आलो तर सरांवर फार ताण पडेल. "समीर म्हणाला, " अजून एक,आता मला परदेशी जाण्याची इच्छा नाही. तेव्हा एप्रीलपासून मी तुमच्याबरोबर काम करेन. "

"हे तर फारच छान झाले. " बाबा समाधानाने म्हणाले. इकडे समीरची परत घालमेल सुरु झाली. आता वृंदाचे बहुतेक प्रश्न सुटण्याच्या मार्गावर होते. भाईजीने सर्व ट्रान्स्फर रितसर करून घेतले होते. वृंदाने समीरला तसे सांगितले होते. बँकेने कर्ज पूर्ण फेडल्याचे लेटर पाठविले होते. आता फक्त एकच गोष्ट बाकी होती ती वृंदाला सर्व सत्य सांगणे आणि परिणाम भोगणे. समीर याच गोष्टीला घाबरत होता. सत्य कळल्यावर ती आपल्याला क्षमा करेल की आपला

आपला तिरस्कार करेल याविषयी तो साशंक होता. एका बाबतीत मात्र तो ठाम होता ते म्हणजे पूर्ण सांगितल्याशिवाय तो जाणार नव्हता. इतक्या दिवसांच्या सहवासाने ती किती निश्चयी आणि मानी आहे हे त्याला कळले होते. नकळत तो तिच्यावर प्रेम करू लागला होता. इतर ठिकाणी बेधडक बोलणारा समीर याबाबतीत मात्र मुका व्हायचा कारण एकच खरे सांगितल्यावर काय होईल याची त्याला खात्री नव्हती.

अशाच घालमेलीत मार्च उजाडला. वार्षिक परीक्षांचा रेटा सुरु झाला. समीरने निश्चय केला की आता काय व्हायचे होऊदे पण खरे सांगून मोकळे व्हायचे आणि त्याने वृंदाला पत्र लिहायला घेतले. काय झाले ते सर्व लिहिल्यावर त्याने ते पाकिटात ठेवले. वर वृंदाचे नाव लिहिले आणि तो द्यायला निघणार तेवढ्यात त्याचा धीर सुटला. समोरासमोर आपण बोलू शकणार नाही याची त्याला खात्री वाटली आणि तो विचार त्याने रहीत केला.

दुसरे पत्र राजीनाम्याचे होते. ते तुलनेने सोपे होते. ते त्याने पटकन लिहीले. ते घेऊन सरांकडे गेला आणि त्यांना पत्र देत म्हणाला, “ सर हा माझा राजीनामा.

“का रे अचानक?”

“अचानक कुठे सर. पुढच्या महिन्यात करार संपतोच आहे. एक महिना आधी जातो एवढेच. ”

दोन मिनिटे विचार करून सर म्हणाले, “ तुझी उणीव फार जाणवेल पण तुला जावे लागणारच आहे. ठीक आहे. ऑल द बेस्ट. ”

“ थैंक यू सर. ”

सरांनी मीटिंग मधे हे सांगताच सर्वांनी एकच गलका केला. ‘काय समीर, असे अचानक? आम्हाला सेंड ऑफ पार्टी द्यायला तरी वेळ द्यायचा’हे तर सर्वांनीच विचारले.

“सॉरी गाईज, मी पाचच्या गाडीने निघत आहे. ”सर्वांशी हात मिळवून समीर बाहेर पडला. याही वेळेस वृंदाशी बोलायचे त्याला धैर्य झाले नाही. एव्हाना चार वाजले होते. तो त्याच्या ऑफिस मधे पोचला. विजय बरोबर होताच. त्याचे सारखे बोलणे सुरुच होते. समीरचे त्याकडे अजिबात लक्ष नव्हते. ऑफिस मधे गेल्यावर तो क्षणभर खुर्चीत बसला. ऑफिसच्या सहकाऱ्यांशी थोडे बोलला. खिशातल्या पाकीटाकडे त्याचे लक्ष गेले. काय करावे? द्यावे की न द्यावे या विवंचनेत असतांना त्याचे लक्ष विजयकडे गेले. त्याने ते पाकिट काढून विजयला दिले आणि म्हणाला, “ विजय, माझे शेवटचे एक काम करणार काय?”

“करणार म्हणजे काय करणारच. ”

“ एवढे पाकीट फक्त वृंदा मॅडमला दे आणि सांग मी साडेचारपर्यंत उत्तराची वाट बघत ऑफिसमधेच आहे. ”

ठीक आहे हो म्हणत विजय गेला. चारचे सव्वाचार झाले,साडेचार झाले तरी वृंदा आली नाही. समीरने निष्कर्ष काढला की पत्र वाचल्यावर वृंदाने नकार दिलेला दिसतो. ती हो तरी कशी म्हणेल? कोणती मुलगी आपल्या भावाच्या मृत्युला जबाबदार असलेल्या माणसाशी लग्न करेल? जाऊ द्या निदान आतातरी तिला सगळे कळले ते बरे झाले.

# प्रकरण १५

अशा उद्विग्न मन:स्थितीत समीर पावणेपाचच्या दरम्यान स्टेशनवर पोचला. प्लॅटफॉर्म नंबर तीन वर गाडी बरोबर पाच वाजता आली. समीर त्याच्या जागेपर्यंत पोचला तर तिथे त्याच्या जागेवर एक तरूण अजून बसून होता. “एक्सक्यूज मी.” समीर म्हणाला, “या जागेचे माझे रिझर्व्हेशन आहे. ”

“हो मी उतरणारच आहे. गर्दी कमी होण्याची वाट बघत होतो. माझी पत्नी कुली आणायला गेली आहे. ” तो घाईने उठत म्हणाला आणि उठत असतांना त्याने काठीचा आधार घेतला. ते बघून समीर ओशाळला आणि घाईघाईने म्हणाला, “सॉरी. मला कल्पना नव्हती. तुम्ही बसा निवांत. तशीही गाडी वीस मिनिटे थांबते. ” तेवढयात त्याची पत्नी आली आणि सांगू लागली की काय करावे हो, इथे कुली पण मिळत नाही. समीर तातडीने उठला आणि म्हणाला, “ कोणते आहे तुमचे सामान दाखवा. मी काढतो. ” ते दोघेही काही बोलायच्या आत समीरने त्यांचे सामान डब्याबाहेर काढले पण तसाही गाडी सुटायला वेळ होता म्हणून तो म्हणाला, “ आता हे स्टेशनबाहेर कसे नेणार?”

तो तरुण परत संकोचाने म्हणाला, “ स्टेशनबाहेर न्यायचे नाही. या चार नंबरवर जी गाडी उभी आहे तिच्यातच समोरच्या डब्यात ठेवायचे आहे. ”

समीर हसून म्हणाला, “ अहो यात काय इतका संकोच करायचा ? चला मी ठेवतो. ”

“समोरचाच डबा आहे. ”

“मग तर अजूनच सोपे” समीर म्हणाला आणि बोलता बोलता समीरने त्यांचे सामान नेऊन ठेवले पण. विलक्षण संकोचाने त्या पतीपत्नीने चार-चार वेळा समीरचे आभार मानले आणि ते जागेवर बसले. अजून वेळ होता म्हणून समीरने चहा आणला आणि ते चहा घेतांना बोलू लागले.

“खरच तुम्ही भेटला नसता तर.. ”

“ काही झाले नसते. दुसऱ्या कोणी मदत केली असती. ” मग विषय बदलण्यासाठी समीर म्हणाला, “तुमच्या पायाला काय झाले ?”

तो तरुण म्हणाला, “ एक अपघात झाला होता. ”

“ अपघात? केव्हा, कुठे ? फार त्रास होणार नसेल तर सांगा. ”

“त्रास कसला त्यात? १५ एप्रील २०१० ला पुण्यात गुलमोहर रोडवर पहाटे तीनच्या सुमारास मला एका स्कूटरवाल्याने उडवले. ”

समीरच्या हातातला चहा सांडला.

“मग काय झाले?”

“त्या स्कूटरवाल्याने मला एका गुलमोहराच्या झाडाखाली नीट बसवले आणि बहुधा मदत आणण्याकरीता तो गेला असावा. तेवढ्यात एक गंमत झाली. ”

“गंमत?”

“आता गंमतच म्हणायची, तेव्हा प्राणावर बेतले होते तो भाग वेगळा. ”

“ गंमत सांगणार होता ना?”

“अहो, पुण्याहून मुंबईला जाणारी एक फॅमिली मला झाडाखाली पडलेला बघून थांबली. ते तिघेजण होते. त्यांनी मला उचलले आणि मुंबई रोडवर गोगटे हॉस्पीटलला अॅडमिट केले. ”

“पण ते तर हायवेला विरुद्ध दिशेला आहे. ”

“हो ना. मी नंतर विचारले तर ते म्हणाले त्यांच्यापैकी एकजण लंडनला जात होता. त्याला मुंबई एअरपोर्टवर सोडायला ते जात होते. त्यामुळे परत पुण्याला जाणे त्यांना सोयीचे नव्हते. तसेही गोगटे हॉस्पिटल कारने वीस मिनिटावर होते. तरी एकजण गोगटे हॉस्पिटलला माझ्याजवळ थांबला आणि दोघे पुढे गेले. ”

‘आणि आम्ही तुला पुण्यात शोधत होतो’समीर मनात म्हणाला. तो तरुण पुढे सांगू लागला,“पण झाले ते छानच झाले. तो स्कूटरवाला मला कधी भेटला तर मी त्याला कडकडून मिठी मारेन आणि त्याचे आभार मानेल. ”

“का बर?”

“अहो त्या हॉस्पिटलला मी सहा महिने अॅडमिट होतो आणि डिस्चार्ज मिळतेवेळी माझ्यावर उपचार करण्याऱ्या लेडी डॉक्टरशीच माझे लग्न झाले. ” पत्नीकडे बोट दाखवित तो म्हणाला, “तीच ही. ”

तीपण झकास लाजली.

समीर मनापासून हसला आणि त्याचे मणामणाचे ओझे क्षणात दूर झाले.

“ एवढे सर्व सांगितले पण तुमचे नाव नाही सांगितले. ”

“ खरच की माझे नाव वि..... ” पुढचे काहीच ऐकू आले नाही कारण त्याचवेळी गाडीने एक कर्कश शिट्टी दिली आणि हालली. गाडी निघतांना जो मोठा गलका होतो त्यामुळे पुढचे काही ऐकू आले नाही.

समीरला परत हसू फुटले. आता तो स्वतःवर हसत होता. नाव काहीही असले तरी आता कळून काय फरक पडणार होता ? तरीपण या वेळी शंकेला जागा नको म्हणून त्याने दिपकला फोन लावला.

“दिपक, शशी कुठे आणि कशाने गेला तुला माहिती आहे ?”

“ दादा पुण्याला एका कॉन्फरन्सला गेला होता. तिथे हार्ट अटॅकने गेला. का हो सर काय झाले ?”

“ काही नाही. सहज विचारले. ”

त्याने वृंदाला पत्र लिहून स्वतःच पायावर कुऱ्हाड मारून घेतली होती. शशी नसला तरी दुसरा कोणी आपल्या हातून मारला गेला असा तिचा समज होणे स्वाभाविक होते म्हणूनच तिने आपल्याला नाकारले असावे असा विचार करत तो जड पावलांनी आपल्या डब्याकडे आला. आता जे काही झाले ते जरी तिला सांगितले तरी ते रचलेले आहे असेच तिला वाटेल तेंव्हा आता पुण्याला जाऊन कामाला जुंपून घेणे हा एकच मार्ग राहिला होता. गाडी सुटायची वेळ झाली होती. तेवढ्यात त्याला वृंदा आणि तिच्या मागे बऱ्याच अंतरावर विजय

धावत येताना दिसले. समीर दाराजवळच उभा होता. जवळ येताच वृंदा घाम टिपत म्हणाली,

“ मला आताच विजयने सांगितले की तू बोलावले . काहीतरी सांगायचे आहे म्हणत होता. ”

सारे धैर्य एकवटून समीर म्हणाला, “ वृंदा, माझे तुझ्यावर प्रेम आहे. माझ्याशी लग्न करशील ?”

वृंदा बावरली. मोहक हसून म्हणाली, “ करीन. हे सांगायला तू मला रेल्वे प्लॅटफॉर्मवर बोलावले ?”


तोच धापा टाकत विजय मागोमाग येत म्हणाला, “अहो पाकीट घेऊन निघालो तर सरांनी बोलावले. तिथेच साडेचार वाजले मग वृंदाला फोन केला तर ती घरी गेलेली मग तिला पुढे पाठवले आणि मी इथे आलो. या गडबडीत पाकीट द्यायचे राहीले हो. ”


पाकीट घेऊन त्याचे तुकडे करीत समीर म्हणाला, “काही हरकत नाही. चांगले केले. ”

“सॉरी समीर. पण नोकरी महत्त्वाची असते हो. ”

तेवढ्यात गाडीची शिट्टी वाजली आणि गाडी हलू लागली. त्याबरोबर वृंदाला आपल्याबरोबर डब्यात ओढून घेत समीर म्हणाला, “ बरोबर आहे विजय. नोकरी खरच महत्त्वाची असते पण छोकरी जास्त महत्वाची असते. ”

समाप्त















कव्हरवर फ़क्त एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.



# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १५ वे वर्ष.

# जगदिश खांदेवाले यांचे हे सातवे पुस्तक.

जगदिश खांदेवाले यांच्या कथा वास्तवाशी जवळिक साधणाऱ्या, मनोरंजक आणि वैविध्यपूर्ण असतात. ते लिहितात कमी. पण जे लिहितात ते सकस, जोमदार, आणि भरीव असते. त्यामुळे ते वाचकांच्या मनाची पकड घेते. त्यांच्या पुस्तकांवर असंख्य वाचकांचा प्रतिसाद येतो आणि त्यात एक गोष्ट आवर्जून सांगितली जाते. ती म्हणजे"तुमचे पुस्तक हातात घेतल्यावर पुर्ण केल्याखेरिज खाली ठेवता येत नाही". त्यांच्या पुस्तकांना भरपुर मागणी आहे. पण ते अत्यंत मेहनतीने लिहीलेली आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४९), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (९), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे

वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३६), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (३), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(७) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (५), जयश्री पटवर्धन(६) अरविंद बुधकर (२) प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (१०), सविता शेट्टी(३) यशवंत कदम(६) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमुर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।